रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ११०
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, ६ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## वर्ल्डकपमध्ये भारताचा सलग आठवा विजय; द. आफ्रिकेचा धुव्वा



**कोलकाता** : विश्वचषक स्पर्धेत यजमान भारतीय संघाने विजयी अश्वमेध पुढे नेत रविवारी (दि. ५) सलग आठवा विजय नोंदवला. भारताने दक्षिण आफ्रिकेला तब्बल २४३ धावांनी मात देत गुणतालिकेतील अव्वल स्थान कायम राखले आहे. या सामन्यात बर्थडे बॉय विराट कोहलीने वनडे क्रिकेटमधील ४९वे शतक झळकावत मास्टर-ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या विक्रमाशी बरोबरी साधली आहे. त्यालाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला, तर गोलंदाजांनीही खणखणीत कामगिरी कायम ठेवली. या वेळी फिरकीपटू रवींद्र जडेजाने पाच विकेट्स घेत आफ्रिकेच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३२६ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात आफ्रिकेचा डाव २७.१ षटकांत ८३ धावांवर संपुष्टात आला.

**अंतरंग**
पनवेलजवळ दोन अपघातांत एक ठार; दोनजण जखमी/३
चला साजरी करू पर्यावरणस्नेही दिवाळी!/५
जिल्हास्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत 'सीकेटी' विजेते/८

### ग्रामपंचायत निवडणुकीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद


# आज मतमोजणी अन् निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात रविवारी (दि. ५) १७७ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी शांततेत मतदान झाले. सदस्यपदाच्या ३३९५ व सरपंचपदाच्या ४८५ अशा एकूण ३८८० उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदानयंत्रात बंद झाले आहे. मतमोजणी सोमवारी (दि. ६) होणार आहे.

रायगडात २१० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक जाहीर करण्यात आली होती. त्यापैकी ३३ ग्रामपंचायतींची निवडणूक बिनविरोध झाली, तर १७७ ग्रामपंचायतींसाठी मतदान प्रक्रिया झाली. २१० ग्रामपंचायतींच्या १८५४ सदस्यांसाठी निवडणूक होणार होती. ४४ जागांसाठी उमेदवारी अर्ज आले नाहीत. त्यामुळे या जागा रिक्त राहणार आहेत, तर ५६४ सदस्य बिनविरोध निवडून आले. त्यामुळे १२४६ सदस्यांसाठी मतदान घेण्यात आले. सदस्यपदासाठी ३३९५ उमेदवार रिंगणात आहेत.

२१० ग्रामपंचायतींच्या सरपंचांची थेट जनतेतून निवड होणार आहे. चार ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी एकही अर्ज आला नाही. त्यामुळे तेथील सरपंचपद रिक्त राहणार आहे, तर ३८ ग्रामपंचायतींचे सरपंच



बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित १६८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदांसाठी रविवारी मतदान घेण्यात आले. याकरिता ४८५ उमेदवार रिंगणात आहेत.

सकाळी ७.३० वाजता मतदानाला सुरुवात झाली. सुरुवातीला मतदान संथगतीने सुरू होते. ७.३० ते ९.३० या पहिल्या दोन तासांत १३.२६ टक्के मतदान झाले. ११.३० वाजेपर्यंत ३२.८४ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. दुपारनंतर मोठ्या प्रमाणावर मतदार बाहेर पडले. त्यामुळे काही ठिकाणी रांगा लागल्या होत्या. एकूण ८६ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सोमवारी मतमोजणी होणार आहे. त्या वेळी मतदारांनी कोणाच्या बाजूने कौल दिला आहे हे स्पष्ट होईल.



**पनवेल : तालुक्यात १७ ग्रामपंचायतींची मतदान प्रक्रिया रविवारी झाली. यातील दुंदरे, रिटघर, चिंचवली ग्रामपंचायत या ठिकाणी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.** (छाया : संकेत भोईर) **अधिक छायाचित्रे पान ३ वर..**

## कर्जतमध्ये दोन गटांत हाणामारी

### परस्परविरोधी गुन्हे दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाच्या आदल्या दिवशी कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या चांदई येथे दोन गटांत हाणामारी झाली. या प्रकरणी परस्परविरोधी २४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला असून तीन ते चार जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या हाणामारीत लोखंडी रॉड, लाकडी दांडके, दगडाचा वापर करण्यात आल्याने काहींच्या डोक्याला मार लागला, तर काही रक्तबंबाळ होऊन गंभीर जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर कार्यकर्ते आजही नाराज -डॉ. निलम गोऱ्हे

**अलिबाग : प्रतिनिधी**



एकनाथ शिंदे लोकाभिमुख मुख्यमंत्री आहेत. ते आमदारांचे म्हणणे ऐकून घेतात व प्रभावीपणे काम करीत आहेत, तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्यात कृतीशिलतेचा अभाव आहे. ते कार्यकर्त्यांना वेळ देत नाहीत. त्यांच्या कार्यशैलीवर कार्यकर्ते आजही नाराज आहेत, अशी टीका विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी केली.

शिवसेना महिला संघटन अलिबाग यांच्यातर्फे अलिबाग वरसोली येथे उद्यम सखी प्रदर्शन व विक्री दिवाळी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्‍घाटन विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांच्या हस्ते शनिवारी (दि. ४) झाले. उद्‍घाटन समारंभानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या. आमदार महेंद्र दळवी या वेळी उपस्थित होते.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र उद्धव ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले याचे आम्हा सर्वांना समाधान होते. त्यांना मुख्यमंत्री करण्यात आमचा सहभाग होता याचा आम्हाला आनंद होता, परंतु त्यांच्या आजारपणामुळे किंवा इतर कारणांमुळे ते वेळ देऊ शकत नव्हते. त्यांच्यात कृतीशिलतेचा अभाव होता. ते आमदारांना वेळ देत नव्हते. बैठकीला थोडा वेळ यायचे आणि निघून जायचे. त्यानंतर कुणीतरी बैठक सुरू ठेवायचे. त्यामुळे नाराजी होती. आजही उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीवर कार्यकर्ते नाराज आहेत. केवळ बाळासाहेब ठाकरे यांचा पक्ष आहे, म्हणून कार्यकर्ते त्या पक्षात आहेत. उद्धव ठाकरे यांना त्यांच्या कार्यशैलीत बदल करावा लागेल, असे डॉ. गोऱ्हे म्हणाल्या.

एकनाथ शिंदे कृतीशिल व लोकाभिमुख मुख्यमंत्री आहेत. ते प्रभावीपणे काम करीत आहेत. ते आमदारांना सांभाळून घेतात. त्यांचे म्हणणे ऐकून घेतात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून केवळ २७ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून २०० कोटींपेक्षा जास्त निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून देण्यात आला. तो थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचला, असे डॉ. गोऱ्हे यांनी या वेळी सांगितले.

### स्त्री सक्षमीकरणासाठी लोकसहभाग महत्त्वाचा

स्त्री सक्षमीकरणासाठी शासन अनेक योजना राबवते. काही योजना स्त्रियांपर्यंत पोहचत नाहीत. म्हणून स्त्री सबलीकरण करण्यासाठी केवळ शासन-प्रशासनावर अवलंबून न राहता समाजाचा सहभागदेखील त्यासाठी महत्त्वाचा आहे. जास्तीत जास्त योजना स्त्रीकेंद्रित असल्या पाहिजेत. जसा जिल्हा वार्षिक आराखडा असतो तसा प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी सेवा जिल्हा आराखडा असला पाहिजे. राज्याच्या सीमेवरील जिल्ह्यांमध्ये बेकायदेशीर फिरते गर्भ लिंग निदान केंद्र चालवली जातात. त्यातून महिलांना शेजारच्या राज्यांमध्ये नेऊन गर्भपात केला जातो. त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, असेही विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे या वेळी म्हणाल्या.

## निवडक

### महादेव ॲप प्रकरणातील आरोपीचे बघेलांकडे बोट

**दुबई** : महादेव या ऑनलाइन बेटिंग ॲपच्या प्रवर्तकांनी छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना आतापर्यंत ५०८ कोटी रुपये दिल्याचा दावा सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) केला आहे. अशातच या प्रकरणातील आरोपी शुभम सोनी याने छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या सांगण्यावरूनच दुबईला गेल्याचे म्हटले आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

### भारतीय सैन्यातील महिला जवानांना आता समान रजा

**नवी दिल्ली** : भारतीय सैन्यात सशस्त्र दलातील महिला जवानांना मातृत्व, बालसंगोपन आणि मूल दत्तक घेण्यासाठी अधिकाऱ्यांइतकीच रजा मिळणार आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे महिला जवानांच्या सैन्यातील कामाच्या स्थितीत सुधारणा तसेच महिलांना व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवनात संतुलन राखण्यास मदत होईल.

## राज्यात कांदा अनुदानासाठी ८४ कोटी मंजूर

### उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी होणार गोड!

**मुंबई : प्रतिनिधी**

फेब्रुवारी-मार्चमध्ये सरकारने कांदा उत्पादकांना जाहीर केलेल्या अनुदानातील शिल्लक ८४ कोटी एक लाख रुपयांची रक्कम तातडीने वितरित करण्याचे आदेश दिले आहेत. यात नाशिक जिल्ह्यातील कांदा उत्पादकांचाही समावेश आहे.

पात्र शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल, जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले होते. अनुदानापोटी ५५० कोटी इतकी रक्कम पावसाळी अधिवेशनात पूरक मागणीद्वारे मंजूर करण्यात आली असून ४६५ कोटी ९९ लाख वितरीत करण्यास यापूर्वी वित्त विभागाने मान्यता प्रदान केली आहे.

कांदा अनुदान वितरणासंदर्भात आयसीआयसीआय बँकेकडून दोन टप्प्यात ४५२ कोटी २५ लाख ६८ हजार ६९२ इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तांत्रिक बाबींमुळे देयक नाकारलेल्या व कार्यवाही सुरू असलेल्या नोंदीसाठी २४ कोटी ९२ लाख १९ हजार ७६२ इतकी रक्कम अदा करणे बाकी आहे.

पावसाळी अधिवेशनात पूरक मागणीद्वारे मंजूर करण्यात आलेल्या ५५० कोटी रुपये या रकमेपैकी ८४ कोटी एक लाख इतका उर्वरित निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने नुकतीच मान्यता दिल्याने शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

पात्र प्रस्तावाची तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी



संस्था तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी छाननी करून ती यादी पणन संचालक, पुणे यांनी अंतिम केलेल्या यादीनुसार अनुदान थेट बँक हस्तांतरणद्वारे लाभार्थीच्या बचत बँक खात्यात जमा केले जाणार आहे. पात्र लाभार्थींच्या यादीचे संबंधित ग्रामसभा अथवा चावडी येथे वाचन करावे. ग्रामपंचायतीच्या फलकावर यादी प्रसिद्ध करावी. अनुदान वितरीत करताना प्रकरणवार शहानिशा करून तक्रारी होणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी. अपात्र लाभार्थी अथवा अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसेंची प्रकृती बिघडली

**जळगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांची प्रकृती अचानक बिघडली आहे. त्यांच्या छातीत वेदना होत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे त्यांना एअर ॲम्ब्युलन्सने मुंबईत हलवण्यात येणार आहे. तशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिल्या असून खडसे यांच्यावर मुंबईत पुढील उपचार केले जाणार आहेत.

एकनाथ खडसे यांच्या छातीत शनिवारी रात्रीपासून दुखत होते. त्यामुळे नियमित तपासणी करण्यासाठी ते रविवारी (दि. ५) मुक्ताईनगर येथील रुग्णालयात गेले होते. तपासणीत डॉक्टरांना त्यांच्या शारीरिक हालचालीत काही बदल आढळून आले. त्यामुळे खडसे यांच्यावर तेथील वैद्यकीय चमूने लागलीच उपचार सुरू केले.

## महाड दुर्घटनेतील चार कामगार अद्यापही बेपत्ता; शोधमोहीम सुरूच

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील ब्ल्यू जेट हेल्थकेअर कारखान्यात आग लागून झालेल्या स्फोटात सात मृतदेह सापडले असले तरी चार कामगार अद्यापही बेपत्ता असून शोधमोहीम सुरू आहे.

रायगड जिल्ह्याला हादरवून सोडणाऱ्या महाड येथील ब्ल्यू जेट हेल्थकेअर या कारखान्यात ३ नोव्हेंबर रोजी सकाळी आग लागून मोठा स्फोट झाला होता. या दुर्घटनेमध्ये सात कामगार जखमी झाले होते, तर ११ कामगार बेपत्ता होते. दुसऱ्या दिवशी ११पैकी सात कामगारांचे मृतदेह कोळसा झालेल्या अवस्थेत सापडले. त्यानंतरही एनडीआरएफ व अग्निशमन दलाकडून शोधमोहीम सुरू असूनदेखील उर्वरित चार कामगारांचे मृतदेह सापडलेले नाहीत.



स्फोट झालेल्या ठिकाणी अतिज्वलनशील रसायन असल्यामुळे लोखंडी स्ट्रक्चर कापण्यासाठी गॅस कटरचाही वापर करता येत नाही, मात्र तरीही दिवसरात्र एक करून आम्ही हे मृतदेह शोधून काढू असा विश्वास तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक मारूती आंधळे यांनी व्यक्त केला आहे, पण जर का हे मृतदेह सापडले नाहीत तर त्यांच्या नातेवाईकांना मदत मिळणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## वेध दिवाळीचे..!



**पनवेल : दिपावली म्हणजे तिमिरातून तेजाकडे नेणारा उत्सव. दिवाळी जवळ येत असल्याने बाजारपेठेत आकर्षक आकाशकंदिल विक्रीसाठी आले असून ग्राहकांकडून त्याची खरेदी सुरू झाली आहे.** (छाया : सुबोध ठाकूर)

## बर्थडे बॉय विराटची शानदार खेळी

### सचिन तेंडुलकरच्या विश्वविक्रमी ४९ शतकांशी बरोबरी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने विश्वचषक स्पर्धेत रविवारी (दि. ५) झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात वनडे क्रिकेटमधील ४९वे शतक केले. यासह विराटने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरच्या विश्वविक्रमाशी बरोबरी केली आहे. सचिनच्या वनडे शतकांची बरोबरी केल्यानंतर विराटवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

आपल्या वाढदिवशी विराट कोहली शतक झळकावणार की नाही याची उत्सुकता सर्वांनाच होती, कारण विराट या वेळी सचिनच्या ४९व्या शतकांच्या वर्ल्ड रेकॉर्डशी बरोबरी करणार होता. त्यामध्येच त्याचा रविवारी वाढदिवस होता. त्यामुळे तो आपल्या ३५व्या वाढदिवशी ४९वे शतक साजरे करणार का याकडे सर्वांचे डोळे लागले होते. चाहत्यांच्या अपेक्षा





पूर्ण करीत विराटने शतकी खेळी केली. सचिनने त्याच्या एकदिवसीय कारकिर्दीत ४५२ डावांत ४९ शतके केली आहेत. विराटने आपल्या २७७व्या डावांत ही कामगिरी केली.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये आपल्या



*विराट छान खेळलास. या वर्षाच्या सुरुवातीला ४९वरून ५०वर जाण्यासाठी मला ३६५ दिवस लागले. मला आशा आहे की, तू ४९वरून ५० शतकांपर्यंत पोहचशील आणि पुढील काही दिवसांत माझा विक्रम मोडशील. अभिनंदन!*

**-सचिन तेंडुलकर**

वाढदिवशी शतक झळकावणारा विराट सातवा खेळाडू ठरला आहे. त्याच्या आधी टॉम लॅथम, रॉस टेलर, सनथ जयसूर्या, मिचेल मार्श, सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळी यांनी ही कामगिरी केली आहे.

विराटने हे शतक अतिशय खास असल्याचे सांगितले. यापेक्षा मोठा क्षण कोणता असू शकतो, असेही तो म्हणाला.

# ग्रामपंचायत निवडणुकीसाठी भरघोस मतदान

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील महत्त्वाच्या समजल्या जाणार्‍या चिरनेर, दिघोडे व जासई ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रविवारी (दि. ५) शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. या वेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. चिरनेर ग्रामपंचायतीमध्ये ८७ टक्के मतदान झाले. दिघोडे ग्रामपंचायतीमध्ये ८५ टक्के तर जासई ग्रामपंचायतीमध्ये ८० टक्के मतदान झाले आहे.

चिरनेर, दिघोडे व जासई या तीन ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी व ४१ सदस्यपदासाठी रविवारी मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजल्यापासून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या देखरेखीखाली शांततेत मतदान झाले.चिरनेर, दिघोडे व जासई या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना व शेकाप महाआघाडीच्या विरोधात भाजप असा सामना रंगणार आहे. चिरनेर ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी दोन तर १४ सदस्य पदासाठी २८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. दिघोडे ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी चार तर नऊ सदस्य पदासाठी १९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. जासई ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी तीन आणि १७ सदस्य पदासाठी ३४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत.

शिवसेना, काँग्रेस व शेकाप या पक्षातील नेते कार्यकर्ते हे गाव पातळीवर महाविकास आघाडीच्या माध्यमातून भाजपाविरोधात निवडणुकीला सामोरे जात आहे. तरीही गावपातळीवरील या निवडणूका नात्यागोत्यात लढविल्या जात असल्याने मतदानाची आकडेवारी ही वाढत आहे. रविवारी सकाळपासून मतदान केंद्रावर मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपला प्रतिसाद दर्शविला होता.

कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी उरण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश निकम यांनी चोखपणे बंदोबस्त तीन ग्रामपंचायतीच्या मतदान केंद्रावर ठेवला होता. सोमवारी (दि. ६) बोकडविरा येथे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत सकाळी मतदान मोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने गावपातळीवरील निवडणुकीत मतदारांनी कोणाच्या बाजूने आपला कौल दिला आहे याची उत्सुकता सध्या सर्वांना लागून राहिली आहे.





(छाया : धम्मशील सावंत)

## सुधागडात तीन केंद्रांवर ईव्हीएम मशीन बंद

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात १३ ग्रामपंचायत निवडणूक प्रक्रिया पार पडली. ग्रामपंचायत निवडणूक मतदानादरम्यान रविवारी (दि. ५) जांभूळपाडा, वावे व रासळ या केंद्रावर अर्धातास ईव्हीएम मशीन बंद पडल्या होत्या. या वेळी मतदानासाठी गर्दी होऊन काहीवेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मतदारांना ताटकळत उभे राहावे लागले.

याठिकाणी ईव्हीएम मशीन सुरू झाल्यावर मतदान सुरळीत झाले. मात्र त्यानंतरही मतदारांच्या रांगा लागल्या होत्या.

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील सात ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आज मतदान घेण्यात आले. सरासरी ८७ टक्के मतदान झाले. गेले काही दिवस निवडणूक होत असलेल्या ठिकाणी शाब्दिक चकमकी आणि हाणामारीच्या घटना घडल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर सर्वत्र पोलीस प्रशासनाकडून मतदान केंद्राच्या आवारात बंदोबस्त ठेवण्यात आला.

नसरापूर, वदप, गौरकामत, खांडस, ओलमन, नांदगाव आणि आंभेरपाडा येथे ग्रामपंचायतींसाठी रविवारी मतदान घेण्यात आले. नसरापूर ग्रामपंचायतीमध्ये दोन गुन्हे दाखल झाले असल्याने पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. वदप आणि गौरकामत अशा तीन ठिकाणी मिळून कर्जत पोलिसांनी सहा अधिकारी, २६ पोलीस कर्मचारी आणि काही होमगार्ड तैनात केले होते, मात्र तसे असतानाही नसरापूर ग्रामपंचायतीमधील चांदई येथे दुपारी तब्बल ८३ टक्के मतदान झाले होते, तर गौरकामत ग्राम पंचायत मध्ये प्रभाग १ मध्ये दुपारी १ वा. पर्यंत फक्त १० टक्के मतदान झाले होते.

सर्वाधिक चुरस असलेल्या खांडस, नांदगाव, अंभेर पाडा आणि ओलमण या चार ग्रामपंचायत मध्ये राजकीय पक्षांनी जोरदार रंगत आणली होती. त्यामुळे नेरळ पोलिसांनी नेरळ पोलीस ठाण्याचे माजी पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांना खास बाब म्हणून पाचारण केले होते. त्यांच्याशिवाय अन्य नऊ पोलीस अधिकारी तसेच ३२ पोलीस कर्मचारी आणि १५ होमगार्डची मदत घेतली आणि त्यामुळे किरकोळ बाचाबाची वगळता मतदान अत्यंत तणावाखाली परंतु शांततेत झाले. या ठिकाणी पोलिसांकडून मतदार वगळता अन्य कोणालाही मतदान केंद्राजवळ येऊ दिले नव्हते.

सर्व सात ग्रामपंचायतींमध्ये सरासरी ८७ टक्के मतदानाची नोंद झाली असून अंतिम आकडेवारी अद्याप प्रशासनाकडून देण्यात आली नाही. सात ग्रामपंचायतींमध्ये थेट सरपंचपदासाठी २१ तर ६२ सदस्यपदांसाठी १५४ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. सोमवारी (दि. ६) सकाळी १० वाजता कर्जत तहसील कार्यालयात मतमोजणी होणार आहे.



**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील १५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत १४५ सदस्यपदाकरिता २७८ उमेदवार, १३ सरपंचपदाकरिता ३६ उमेदवार रिंगणात उभे असून रविवारी (दि. ५) मतदान झाले. या निवडणुकीत ७० टक्के मतदान झाले आहे.

आगरदांडा ग्रामपंचायतीमध्ये १६६० पैकी १११० मतदारांनी मतदान केले. राजपुरीमध्ये ७० टक्के, शिघ्रेमध्ये ७३ टक्के, विहुरमध्ये ७८ टक्के, नांदगावमध्ये ७८ टक्के, चोरढेमध्ये ६८ टक्के, वळकेमध्ये ६५ टक्के, मिठेखारमध्ये ७२ टक्के, बोर्ली ग्रामपंचायतीमध्ये ४३७५ पैकी २६५१ मतदान झाले.

मांडलामध्ये ९०९, तळेखारमध्ये ९१५, काशिदमध्ये ८६ टक्के मतदान झाले. भोईघरमध्ये ७५ टक्के, साळावमध्ये ६५ टक्के, एकदरामध्ये ७६ टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीकरिता ३३,१४२ मतदार असून १६,४८४ पुरुष तर १६६५८ स्त्री मतदार आहेत. यामध्ये पुरुष ९७७८ तर १०४४८ स्त्रीयांनी आपला हक्क बजावला. या वेळी प्रत्येक केंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



### मतदान मशीन बंद पडले

राजपुरी, बोर्ली, नांदगाव, चोरढे व मोरे या ठिकाणी मतदान मशीन बंद पडल्यामुळे मतदानाचे काम थांबवण्यात आल्याने मतदान प्रक्रियेस उशीर झाला. काही ठिकाणी उशिरापर्यंत मतदान झाले.

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील २१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी रविवारी (दि. ५) मतदान कडेकोट पोलीस बंदोबस्तात शांततेत झाले. तालुक्यात दुपारी ३.३० वाजेपर्यंत ६४.९० टक्के इतके मतदान झाले होते. मतदान संपल्यानंतरची टक्केवारी उशीरापर्यंत प्राप्त झाली नव्हती.

या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांत दिग्गजांचे भवितव्य मतपेटीत बंद झाल्याने नागरिकांची निकालाची उत्सुकता शिगेला पोहचली असून सोमवारी (दि. ६)सकाळी १० वाजल्यापासून मध्यवर्ती प्रशासकीय भवन तहसील कार्यालय माणगाव येथील सभागृहात मतमोजणी होणार आहे.

तालुक्यातील २६ ग्रामपंचायतींपैकी दहिवली तर्फे गोवेले, काकल, चांदोरे, विहूले, कविळवहाळ बु. या पाच ग्रामपंचायतींच्या निवडणुका सरपंच पदासह पूर्ण बिनविरोध झाल्या तर उर्वरित मोर्बा, पुरार, जिते, नागाव, शिरसाट, गोवेले, वारक, वडवली, कडापे, वणीमलईकोंड, उणेगाव, पळसगाव बु., रातवड, वडगाव, भुवन, खरवली, अंबर्ले, भाले, गांगवली, लोणशी, मांजरवणे या २१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी रविवारी मतदान झाले. तालुक्यातील मोर्बा, भुवन, खरवली, भाले, उणेगाव, लोणशी या ग्रामपंचायतींचे निवडणूक निकाल लक्षवेधी ठरणार आहेत.

मोर्बा ग्रामपंचायतीत इंडिया आघाडी विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस यांत कोण बाजी मारणार याकडे तालुक्याचे लक्ष वेधून आहे.

भुवन ग्रामपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश युवक सचिव दिपकशेठ जाधव, खरवली ग्रामपंचायतीत राष्ट्रवादीकडून शिवसेनेत प्रवेश केलेले संतोष खडतर, उणेगावमधून ग्रामपंचायतचे माजी सरपंच राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेंद्र शिर्के यांच्या पत्नी शुभांगी शिर्के यांनी थेट जनतेतून सरपंच पदासाठी उमेदवारी केल्याने या दिग्गजांच्या निकालाकडे तालुक्याचे विशेष लक्ष लागून आहे.




**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात १२ ग्रामपंचायतीसाठी रविवारी (दि. ५) ७८.५४ टक्के मतदान झाले. या १२ ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपद व सदस्यपदाचे भवितव्या मतपेटीत बंदिस्त झाले आहे. या १२ ग्रामपंचायतीचा निकाल सोमवारी (दि. ६) लागणार आहे.

रोहा तालुक्यातील १२ ग्रामपंचायतसाठी रविवारी ३.३०पर्यंत ६६.२९ टक्के मतदान झाले होते. खारगाव, सानेगाव, आरे बुद्रुक, चणेरा, खांबेरे, न्हावे, भातसई, कोकबन, विरजोली, येरळ, तांबडी बुद्रुक, नागोठणे या १२ ग्रामपंचायतींसाठी मतदान झाले.

यातील नागोठणे, भातसई, विरजोली, सानेगाव व कोकबन या ग्रामपंचायतीची निवडणूक प्रतिष्ठेची झाली आहे.



राज्याच्या राजकारणात शिवसेना व राष्ट्रवादी या पक्षाचे दोन गट झाल्यानंतर प्रथमच ग्रामपंचायत निवडणुका होत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर कोणाची ताकद आहे हे या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीनंतर दिसून येईल.

रोहा तालुका श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ, पेण विधानसभा मतदारसंघ, व अलिबाग विधानसभा मतदारसंघात विभाग असल्याने या निवडणुकीत श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, अलिबाग विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे आमदार महेंद्र दळवी व पेण विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे आमदार रवीशेठ पाटील यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

रोहा तालुका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला या बालेकिल्लेत शिवसेनाचे जोरदार आव्हान असल्याचे या निवडणूक प्रचारादरम्यान दिसून आले. त्यामुळे १२ ग्रामपंचायत व एक ग्रामपंचायतच्या पोटनिवडणुकीचा विचार केला असता रोहा तालुक्यात राष्ट्रवादी, शिवसेना, शेतकरी कामगार पक्ष या तीन पक्षात खरी लढत असल्याचे दिसून येते. विरझोली, कोकबन, भातसई, नागोठणे व सानेगाव या ग्रामपंचायती प्रतिष्ठेच्या झाल्या असून या ग्रामपंचायतीच्या सोमवारी लागणार्‍या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील २२ ग्रामपंचायतींपैकी चार ग्रामपंचायतींची निवडणुक बिनविरोध झाल्यानंतर १८ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया रविवारी शांततेमध्ये पार पडली. यानिमित्ताने हजारो चाकरमानी मुंबई, पुणे, पनवेल, नवी मुंबई, कल्याण, ठाणे, सुरत, बडोदा, महाबळेश्वर येथून मतदानासाठी उमेदवार तसेच त्यांच्या राजकीय पक्षांनी आपआपल्या ग्रामपंचायतींच्या मतदानासाठी खासगी वाहनांतून आणले.

यादरम्यान, गोवेले ग्रामपंचायतीचे माजी सदस्य भगवान साळवी यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे अन्य शहरांमध्ये वास्तव्यास असलेल्या मतदारांसाठी स्थानिक मतदारांपेक्षा अधिक खर्च होत असून या खर्चाच्या परतफेडीसाठी ग्रामपंचायतींमध्ये तसेच स्थानिक मतदारांच्या सुविधांमध्ये भ्रष्टाचार होऊन गावांचा विकास खुंटत असल्याने ग्रामपंचायतींच्या मतदारांसाठीही पोस्टल मतदानाची सोय उपलब्ध करण्याची मागणी केली आहे.



बोरावळे, देवळे, कापडे बुद्रुक, महाळुंगे, महालगूर, सडवली, वाकण, माटवण, सवाद, चरई, पळचिल, मोरसडे, गोवेले, पांगळोली, धारवली, आडावळे बुद्रुक, देवपूर व कोंढवी या १८ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी थेट सरपंच आणि सदस्य पदांच्या उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रामध्ये बंद झाले. यावेळी कापडे बुद्रुक ग्रुपग्रामपंचायतीचे मतदान उत्साहवर्धक स्थितीत सुरू झाले. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भर उन्हामध्ये मतदारांची रांग शिस्तबद्धपणे मतदान करताना दिसून आली. या वेळी दुपारनंतर स्थानिक मतदारांचा शोध घेऊन त्यांना मतदान केंद्रांपर्यंत पोहचविण्यासाठी उमेदवारांच्या कार्यकर्त्यांची लगबग दिसून आली.

कापडे बुद्रुक येथे प्रभाग ३चे मतदान दिवसभर उत्स्फूर्त प्रतिसादामध्ये सुरू असताना शेवटच्या तासामध्ये इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्र अचानक बंद पडल्याने तेथे दुसरे यंत्र तातडीने उपलब्ध करण्यात आले. यामुळे काही काळ मतदानप्रक्रिया ठप्प झाली. या मतदान केंद्रातील दोन्ही मतदार यंत्रांतील मतांची मोजणी सोमवारी सकाळी होणार्‍या मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मोजली जाणार आहेत.

## खालापुरात दिव्यांगांनीही बजावला मतदानाचा हक्क

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील २२ ग्रामपंचायतीसाठी मतदान घेण्यात आले. काही ग्रामपंचायतीत सकाळ पासून मतदानाचा उत्साह होता, तर काही ठिकाणी तणाव निर्माण झाला होता. सुरुवातीला पुरूष मतदार यांची गर्दी पाहण्यास मिळाली. ठिकठिकाणी दिव्यांग बांधवांनीही मतदानाचा हक्क बजावला.

सावरोली या आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीत मतदारांची संख्या जास्त होती. वासांबे येथे राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे गटाचे सरपंचपदासाठी उमेदवार असले तरी खरी प्रतिष्ठा भाजप आणि काँग्रेसची दिसणार आहे. मानकिवली, वासांबे, कुंभिवली, खानाव, आत्करगाव, शिरवली, तांबाटी, माजगाव, होनाड याठिकाणी जिल्हा ते तालुका स्थरावरचे नेते उमेदवार म्हणून ग्रामपंचायत लढण्यासाठी उभे असल्याने तालुक्याचे लक्ष या आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या ग्रामपंचायतीकडे लागून राहिले आहे.

हे ज्येष्ठ नेते गाव पातळीवर पुन्हा सक्रिय झाल्याने त्यांना गावच्या बाहेर जाऊन पक्षाचे आणि सामान्य कार्यकर्ते यांचे काम करणे शक्य नाही. भविष्यात पक्षवाढीपेक्षा स्वतःच वलय निर्माण करण्याचा प्रयत्न सक्षम उमेदवार दिसत आहेत.




शिरवली येथे सर्व धनाढ्य उमेदवार एका बाजूला तर उद्धव ठाकरे शिवसेना अशी लढत दिसत असून येथे शिवसेना शिंदे गटाचे नेतृत्व सक्षम आणि आर्थिक बाजू मजबूत असताना त्यांनी सरपंच पदासाठी उमेदवार का दिला नाही, विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांचे गणित काय आहे, हेदेखील येथे स्पष्ट होईल.

शिवसेना उठावानंतर तांबाटी ग्रामपंचायत अभेद्य राहिली. सर्व बैठका, मेळावे, चर्चासत्र येथेच झाली. त्यामुळे विद्यमान सरपंचांना पुन्हा संधी मिळेल अशी आशा आहे. कुंभीवली येथेही वरीष्ठ नेते उमेदवार म्हणून रिंगणात आहेत.

माजगाव ग्रामपंचायत येथे उद्धव ठाकरे गटाने आयात उमेदवार दिले आहेत. वावर्ले, बोरगाव व वरोसे येथेही आपसात टक्कर आहे. २२ सरपंच आणि १५९ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद झाले आहेत. ग्रामीण भागात परप्रांतीय मतदार वाढल्याने त्यांचा कल महत्त्वाचा आहे. आता सोमवारी लागणाऱ्या निकालाकडे सर्वांचे लक्ष आहे.

# पनवेल, उरण तालुक्यात शांततेत मतदान

## थेट सरपंचांसह सदस्यांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात मुदत संपलेल्या १७ ग्रामपंचायतींसाठी तर उरण तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींसाठी रविवारी मतदान प्रक्रिया झाली. पनवेल व उरण तालुक्यात मतदान प्रक्रियेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आता सोमवारी (दि. ६) मतमोजणी होणार असल्याने सर्वत्र उत्सुकता वाढली आहे.

पनवेल तालुक्यातील दापोली, चिखले, विचुंबे, ओवळे, भिंगार, वावेघर, कोन, गुळसुंदे, दुंदरे, देवद, सोमाटणे, गिरवले, कळसखंड, न्हावे व तुराडे, मालडुंगे या ग्रामपंचायतींसाठी ४७ सरपंच आणि ३६० सदस्यपदांसाठी उमेदवार रिंगणात आहेत.

तहसीलदार विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ७३ मतदान केंद्रांवर नियोजन पूर्ण करण्यात आले होते. तालुक्यातील एकही ग्रामपंचायत बिनविरोध झाली नाही.

या निवडणुकीत सरपंचपदाच्या १७ जागांसाठी ४७ तर १७५ सदस्यपदासाठी ३६० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. निवडणुकीसाठी तहसीलदार विजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एका मतदान केंद्र अधीक्षक, तीन मतदान अधिकारी, १७ निवडणूक निर्णय अधिकारी याप्रमाणे एकूण ३६५ अधिकारी व कर्मचारी सज्ज होते.

उरण तालुक्यात जासई, चिरनेर व दिघोडे या तीन ग्रामपंचायतीसाठी मतदान झाले. आता सोमवारी निकाल लागणार असून सर्वांची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

### पोलीस बंदोबस्त

ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परिमंडळ २ कार्यक्षेत्रात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन सहाय्यक पोलीस आयुक्त, १० वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ५० सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, ३६० अंमलदार तसेच चार स्ट्रायकिंग फोर्स व दोन राखीव स्ट्रायकिंग फोर्स प्रत्येक ग्रामपंचायतीच्या हद्दीत तैनात होते.






पनवेल : तालुक्यात १७ ग्रामपंचायतींची मतदान प्रक्रिया रविवारी पार पडली. या अंतर्गत दुंदरे, रिटघर, चिंचवली ग्रामपंचायत येथे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.





पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रविवारी मतदान झाले. यानंतर उत्कर्ष ग्रामविकास मंडळाच्या विजयाचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, अरुणशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, प्रकाश कडू, अनंता ठाकूर, हरेश्वर म्हात्रे, कल्पना ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# गाड्या भाड्याने लावतो सांगून अपहार

## आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी केले गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये गाड्या भाड्याने लावतो असे सांगून अपहार करणाऱ्या एका आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात एका अपहार केलेल्या सेव्हरलेट एन्जॉय गाडीसंदर्भात तक्रार दाखल होताच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गाडी (एमएच ४८ पी ९५७४)चा शोध सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, पोलीस उपनिरिक्षक विनोद लभडे, हवालदार अविनाश गंथडे, पोलीस नाईक अशोक राठोड, शिपाई विशाल दुधे आदींचे पथक गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे घेत असताना गुन्ह्यातील आरोपी इम्रान जिन्ना शेख (वय २८, रा. वडाळा मुंबई) हा नाशिक येथे लपला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.



पोलिसांनी सलग तीन दिवस तपास करून या आरोपीस ताब्यात घेतले व गुन्ह्यातील गाडी अहमदनगर येथून हस्तगत केली आहे. या आरोपीने अशा प्रकारे अनेक जणांच्या गाड्यांचे अपहार केले असल्याने त्याचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहे.

# पनवेलजवळ दोन वेगवेगळ्या अपघातांत एक ठार; दोनजण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव ट्रेलरने त्याच्या पुढे जाणाऱ्या दुचाकीस पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक ठार, एक जखमी तर पनवेलजवळील मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर किमी ०३ येथे खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत मध्यरात्रीच्या सुमारास भरधाव कारची टेम्पोला पाठीमागून धडक बसून झालेल्या अपघातात गाडीतील एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

पहिल्या अपघतात पळस्पे येथे ट्रेलरने दुचाकीला दिलेल्या धडकेत संगीता भागोजी कोकरे (वय ४१, रा. पोलीस कॉलनी, पळस्पे) यांचा मृत्यू झाला, तर चालक भागोजी काळू कोकरे (वय ४२) हे जखमी झाले. या प्रकरणी




पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलर (एमएच ४६ बीयु ३७३५) वरील चालक लाल बहादूर विश्राम पटेल (रा. संडा, चूरहट, मध्य प्रदेश) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. भागोजी कोकरे व संगीता कोकरे या पनवेल ते पळस्पे असा दुचाकी (एमएच ४६ एएस २६९८) ही घेऊन पळस्पेजवळ आले असता पाठीमागून येणाऱ्या ट्रेलरचालकाने दुचाकीला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात भागोजी कोकरे हे जखमी झाले, तर मोटरसायकलच्या पाठीमागे बसलेली संगीता कोकरे यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी ट्रेलर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

दुसऱ्या अपघतात कार (एमएच ०४ डीवाय १२३८) वरील चालक धैर्य गाडा (वय २१, रा. मुंबई) हा मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून पुणे बाजूकडे जात असताना किमी ०३ या ठिकाणी आले असता त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटून शोल्डर लेनवर थांबून असलेल्या आयशर टेम्पो (एमएच १४ एचजी १३७९) यास पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातामध्ये कार चालकाच्या बाजूस बसलेले वरूण पटेल (वय २१, रा.मुंबई) यांच्या डोक्याला किरकोळ स्वरूपाची दुखापत झाली असून त्यांना आयआरबी ॲम्ब्युलन्सने एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचाराकरिता नेले आहे.

# कळंबोलीत मायाक्का देवींचा उत्सव जल्लोषात साजरा

## गजी नृत्य व मिरवणुकीने सर्वांचे वेधले लक्ष

**कळंबोली : प्रतिनिधी**

कळंबोलीत मायाक्का देवीचा उत्सव मोठ्या जल्लोषात अन भक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त कळंबोली वसाहतीमधून मायाक्का देवीच्या प्रतिमेची मिरवणूक वाजत गाजत ढोल-ताशांच्या गजरात, भंडारा उधळीत अन् फटाक्यांच्या आतषबाजित काढण्यात आली. या उत्सवामध्ये कळंबोली वसाहतीमधील धनगर समाज बांधव व मायाक्का देवीचे भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कळंबोलीमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने गेल्या अनेक वर्षापासून राहात आहेत. या समाज बांधवांचे हृदयस्थानी असणाऱ्या मायाक्का देवीच्या उत्सव पारंपरिक पद्धतीने



कळंबोली वसाहतीमध्ये साजरा केला जातो. वसाहतीमध्ये मायाक्का देवीचे मंदिर ही आहे. या मंदिरापासून मायाक्का देवीच्या प्रतिमेचि मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात, भंडारा उधळीत अन् येळकोट येळकोट जय मल्हार चा जय घोष करीत पालखीतून काढण्यात आली.

यामध्ये समाजबंधू, महिला, बच्चे कंपनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मिरवणुकीत महिला भगिनींनी फुगड्याचा फेरही धरला. मायाक्का देवीच्या उत्सवानिमित्त धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने मायाक्का देवीच्या मंदिरात एकत्रित जमा झाले होते. यानिमित्ताने विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते. मायाक्का देवीच्या पालखी सोहळा वाजत-गाजत गजी नृत्याचा आविष्कार करीत भंडारा उधळीत कळंबोली वसाहतीमधून फिरवण्यात आली. या वेळी पालखी सप्तशृंगी मंदिराजवळ येतात धनगर समाज बांधवांनी भंडाऱ्याची उधळण करीत देवीच्या देवळात मिरवणूक घेऊन मानही देण्यात आला.

या पालखी सोहळ्यात तरुण-तरुणी पुरुष महिला वर्ग पिवळ्या रंगाचे वस्त्र परिधान करून सहभागी झाले होते. त्यामुळे पालखी सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.




**पनवेल : महापालिकेतर्फे आयुष्मान भारत कार्ड नोंदणी शिबिर शहरातील भाजी मार्केटजवळील शिव मंदिर येथे घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते झाले. या शिबिरात १५० जणांना आयुष्मान भारत कार्ड काढून देण्यात आले.**

# फरार बांधकाम व्यावसायिक पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या दोन वर्षांपासून फरार असलेल्या बांधकाम व्यावसायिकाला खांदेश्वर पोलिसांनी कुलाबा, मुंबई येथून अटक केली आहे. अझर आयुब भालदार (वय ४०, सीवूड) असे आरोपीचे नाव असून त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

देवदमध्ये बांधकाम सुरू करून ४१ ग्राहकांची तीन कोटी ४७ लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात २०१७मध्ये अझर भालदार याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. इमारत बांधून रजिस्टर करून देतो असे त्याने सांगितले, मात्र घर दिले नाही व पैसे घेऊन आरोपी फरार झाला होता. आरोपीला खांदेश्वर पोलिसांनी मुंबईतून अटक केली. हे अनधिकृत बांधकाम अद्यापदेखील सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या बांधकामावर नैनाने कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

## संपादकीय

# सरकारची दिवाळी भेट

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ८० कोटी गरिबांना दिवाळीची भेट देत मोफत अन्नधान्य पुरविणाऱ्या प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेला आणखी पाच वर्षे मुदतवाढ दिली आहे. कोरोना काळात २०२०मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेद्वारे पाच किलो अन्नधान्य मोफत दिले जाते.

**छत्तीसगडमधील दुर्ग येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोफत रेशन योजनेला पाच वर्षे मुदतवाढ देण्याची घोषणा शनिवारी केली. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेतंर्गत देशातील गरीब लोकांना सरकारकडून रेशन दिले जाते. वैश्विक महामारी कोरोना काळात लॉकडाऊन आणि एकूणच अर्थचक्र थंडावल्याने उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीत देशाचे संवेदनशील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील गोरगरीब जनतेला दिलासा देत गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पाच किलो गहू किंवा तांदूळ मिळतो. लाभार्थ्यांना हे धान्य मोफत मिळते. केंद्र सरकारने सर्वप्रथम ३० जून २०२० रोजी याची सुरुवात केली. त्यानंतर अनेक वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. सध्या ही योजना डिसेंबर २०२३मध्ये म्हणजेच पुढील महिन्यात संपणार होती. आता पाच वर्षांच्या मुदतवाढीनंतर लोकांना डिसेंबर २०२८पर्यंत या योजनेचा लाभ मिळत राहणार आहे. सुमारे ८० कोटी सर्वसामान्य देशवासीय या योजनेचा लाभ घेत आहेत. छत्तीसगडमधील जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी या योजनेबद्दल म्हणाले की, भाजप सरकारने आता देशातील ८० कोटी गरीब लोकांना मोफत रेशन देण्याची योजना आणखी पाच वर्षे वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तुमचे प्रेम आणि आशीर्वाद मला नेहमी पवित्र निर्णय घेण्याचे बळ देते. दिवाळीचा सण आठवडाभरावर असताना या योजनेच्या विस्ताराची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे देशातील गरीब जनतेला दिलासा मिळाला आहे. केंद्राबरोबरच महाराष्ट्र सरकारही राज्यातील जनतेची दिवाळी 'गोड' करणार आहे. सण-उत्सवांमध्ये सर्वसामान्य, गोरगरीब कुटुंबांना दिला जाणार आनंदाचा शिधा दिवाळीतही मिळणार आहे. अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल. आनंदाचा शिधा या संचात एक किलो साखर, एक लिटर पामतेल तर पोहा, मैदा, रवा आणि चणाडाळ असे जिन्नस प्रत्येकी अर्धा किलो दिले जाणार आहेत. हे सर्व अवघ्या १०० रुपयांत मिळणार आहे. खुल्या बाजारात याची किंमत २५० ते ३०० रुपये इतकी आहे. राज्यातील अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारक तसेच छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातील सर्व जिल्हे त्याचबरोबर नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेवरील केशरी शिधापत्रिका असलेल्या नागरिकांना, शेतकऱ्यांना अशा एक कोटी ६६ लाख ७१ हजार ४८० शिधापत्रिकाधारकांना आनंदाचा शिधा मिळेल. हा आनंदाचा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ५३० कोटी १९ लाख इतक्या खर्चासदेखील मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. एकूणच केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुतीचे सरकार जनतेची काळजी घेत आहे. त्यामुळे जनतेचा या सरकारवरील विश्वासही वाढीस लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

# बदलती निवडणूक पद्धती आणि मतदार



**खबरबात**
**विजय मांडे**

नुकत्याच ग्रामपंचायतींच्या निवडणुका पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये स्थानिक पातळीवर वेगवेगळ्या युत्या-आघाड्या करण्यात येतात. त्यामुळे जिल्ह्यातील नव्हे; तर तालुक्यातील, शहरातील, गावातील, अगदी गल्लीतील राजकारण बदलले आहे.

पूर्वी पक्षाने एखादा उमेदवार जाहीर केला की, तन मनाने तो कसा निवडून येईल यासाठी त्याचे कार्यकर्ते जीवाचे रान करीत असत. अगदी चाळीस वर्षांपूर्वीसुद्धा केवळ वडापाव खाऊन कार्यकर्त्यांनी आपले उमेदवार निवडून आणले आहेत. त्या काळी बैलगाडीने प्रवास करावा लागत असे आणि ज्या गावात मुक्काम असे त्या गावात एखादा जवळचा नातेवाईक म्हणजे बहिणीचा नवरा असला आणि तो जर विरोधी पक्षाचा असला की, त्याच्या घरी जाणे सोडाच, तर त्याच्याकडेही ढुंकून न बघणारे कार्यकर्ते होते. त्या वेळी पक्षाला मानणारे निष्ठावंत कार्यकर्ते असल्याने असे त्यांना वागावे लागत असे.

कालांतराने जीप गाड्या प्रचारासाठी वापरण्यात येऊ लागल्या. त्या वेळचे रस्ते मातीचे असत. त्यामुळे प्रचारासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या कपड्याची खूप खराबी होत असे. हल्ली कडक इस्त्रीचे कपडे वापरणारे कार्यकर्ते आहेत. पक्षासाठी नाती गोती विसरणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या खूप होती, तर काही कार्यकर्ते निवडणुकीपुरती नातीगोती दूर ठेवत असत. आता भावाच्या विरुद्ध सख्खा भाऊ निवडणूक लढविण्यास तयार असतो. याचे एकमेव कारण म्हणजे माझ्यापेक्षा कुणी मोठा नाही ही ईर्षा मनामध्ये असते. त्यामुळे 'भाऊबंदकी' तुटलेली अनेक उदाहरणे आहेत.

एखाद्या मोठ्या निवडणुकीची प्रचारसभा शहराच्या ठिकाणी किंवा तालुक्याच्या ठिकाणी असली की कार्यकर्ते स्वखर्चाने बैलगाडीने किंवा मैल न मैल चालत येत असत. मध्यंतरी त्यामध्ये बदल झाला आणि ट्रकने माणसे सभांसाठी आणण्यात येत होती. आता तर रोजंदारीने माणसे आणली जातात आणि तीसुद्धा लक्सरी बस किंवा कारने आणावी लागतात. दिवसेंदिवस त्यामध्येही बदल होऊन वातानुकूलित बस किंवा वातानुकूलित कारची अपेक्षा कार्यकर्त्यांना असते.

टी. एन. शेषन यांनी आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू केली होती. त्यावरही उपाययोजना शोधून निवडणूक जिंकण्यासाठी काहीही करण्यास उमेदवार मागे पुढे पाहत नाहीत. कालच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत एका ग्रामपंचायतीच्या प्रभागात दुपारी १ वाजला तरी केवळ दहाच टक्के मतदान झाले होते. तो भाग एका आदिवासीवाडीचा आहे. अखेर त्या उमेदवाराने कशीतरी जमवाजमव करून सोय केली आणि दुपारी ४ नंतर मतदानासाठी त्या वाडीतील मतदारांनी गर्दी केली. म्हणजे आता आदिवासी मतदारसुद्धा हुशार झाला आहे.

# विविध भूमिका साकारणारे अभिनेते संजीवकुमार



संजीव कुमार यांना बॉलीवूड हरी भाई म्हणायचे. त्यांचे खरे नाव हरिहर जेठालाल जरीवाला होते. जरी आज संजीव कुमार जगात नाहीत तरीदेखील त्यांच्या अभिनयाची छाप आजही त्यांच्या चाहत्यांच्या मनात तशीच आहे. संजीव यांना अभिनयाचा छंद जडला. ते इतरांशी जोडले गेले आणि रंगमंचावर काम करू लागले. तेव्हा त्यांनी भारतीय राष्ट्रीय रंगमंचाच्या माध्यमातून बऱ्याच नाटकात कामे केलीत. अशा प्रकारे त्यांनी आपल्या जीवनाची सुरुवात केली. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयी माहिती.

संजीव कुमार यांचा जन्म ९ जुलै १९३८ साली झाला. त्यांचे जन्म नाव हरिहर जरीवाला होते, परंतु प्रेमाने सर्व नातेवाईक आणि नातेवाईकांनी त्यांना हरिभाई जरीवाला म्हणून ओळखत. त्यांचे वडिलोपार्जित घर सूरत असले तरी चित्रपटसृष्टीच्या इच्छेने त्यांना मुंबईत आणले.

संजीव कुमारने लग्न केले नाही, परंतु अनेकवेळा प्रेम केले. त्यांना एक अंधश्रद्धा होती की, त्यांच्या कुटुंबात मोठा मुलगा १० वर्षांचा झाल्यावर वडिलांचा मृत्यू होतो. हे त्याचे आजोबा, वडील आणि भाऊ सर्वजणांसोबत घडले होते. संजीव कुमारने आपल्या दिवंगत भावाच्या मुलाचा दत्तक घेतला आणि दहा वर्षांचा असताना मरण पावला.

संजीव कुमार यांचा 'हम हिंदुस्तानी' हा पहिला चित्रपट होता. यानंतर त्यांनी बऱ्याच चित्रपटातून छोट्या-मोठ्या भूमिका केल्या आणि हळूहळू आपली ओळख निर्माण केली. यानंतर १९६८मध्ये प्रदर्शित झालेला 'राजा और रंक' चित्रपटाच्या यशानंतर संजीव इंडस्ट्रीमध्ये खऱ्या अर्थाने उभे राहिले. 'संघर्ष'मध्ये त्यांनी दिलीपकुमार यांच्यासोबत छोटीशी भूमिका साकारली होती. त्या छोट्याशा भूमिकेतूनही त्यांनी आपल्या अभिनयाची एक वेगळीच छाप सोडली. दिलीपसाहेबदेखील तेव्हा त्यांच्या अभिनयाने खूप प्रभावित झाले होते. संजीव कुमार आणि शत्रुघ्न सिन्हा यांची घट्ट मैत्री होती. 'खिलौना' चित्रपटात संजीव यांच्या सांगण्यावरूनच शत्रुघ्न यांना खलनायकाची भूमिका मिळाली होती.

संजीव कुमार यांनी आपल्या करिअमध्ये अनेक प्रयोग केले. जेव्हा जेव्हा त्यांना संधी मिळाली तेव्हा त्यांनी केवळ नायक म्हणून काम न करता प्रौढ व्यक्तीच्या भूमिकाही साकारल्या. रंगमंचावर काम करत असताना संजीव कुमार यांनी वयाच्या २२व्या वर्षीच ६० वर्षांच्या व्यक्तीची भूमिका साकारली होती.

संजीव कुमार यांना १४ फिल्मफेअर पुरस्कारांसाठी नामांकन देण्यात आले होते, तीनदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेते म्हणून तर उर्वरित सर्वोत्कृष्ट अभिनेता. त्यांनी दोनदा सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून आणि एकदा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता म्हणून पुरस्कार जिंकले. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार जिंकला. संजीव कुमार यांच्या स्मरणार्थ सर्वोत्कृष्ट अभिनेता, दिग्दर्शक आणि बॅकस्टेज तंत्रज्ञ यांना दरवर्षी पुरस्कार आणि रोख बक्षिसे दिली.

संजीव कुमार यांनी ६ नोव्हेंबर १९८५ रोजी अखेरचा श्वास घेतला. संजीव कुमार यांच्या निधनानंतर त्यांचे दहापेक्षा जास्त चित्रपट प्रदर्शित झाले. बऱ्याच चित्रपटांची शूटिंग बाकी होती. कथा बदलून हे प्रदर्शित केले गेले. संजीव कुमार यांचा 'प्रोफेसर की पडोसन' हा शेवटचा चित्रपट १९९३मध्ये प्रदर्शित झाला होता.

**(साभार : मराठी मोल)**

## बदलते तंत्रज्ञान

# यु ट्यूब व्हिडिओवरील कॉपीराईट स्ट्राईक असे हटवा

सध्या सोशल मीडियावर व्हायरल होणं आणि त्यातून पैसे कमावण्याचा छंद अनेकांना जडला आहे. लोकं व्हायरल व्हिडिओच्या चक्करमध्ये अनेकदा दुसऱ्यांचा कन्टेंट अथवा म्युझिक त्यांच्या व्हिडिओला लावून युट्यूबवर पोस्ट करतात. या कृतीने अशा लोकांच्या व्हिडिओवर युट्यूबकडून कॉपी राईट स्ट्राईक लागतो. ज्यामुळे जरी हा व्हिडिओ व्हायरल झाला तरी त्यातून काही फायदा मिळत नाही. तुमच्यासोबत असं व्हायला नको, त्यासाठी आम्ही तुम्हाला कॉपीराईट स्ट्राईक हटवणे आणि त्यातून वाचण्याचा मार्ग सांगणार आहोत.




एखाद्या व्हिडिओवर कॉपी राईट तेव्हा लागतो जेव्हा तुम्ही दुसऱ्या युजरचा व्हिडिओ बनवून तुमच्या अकाऊंटला अपलोड करता. जर तुम्ही अन्य कुणाचं गाणं तुमच्या व्हिडिओला लावलं तर त्यावर कॉपी राइट येतो. जर एखादे बुक, स्टोरी, नोवेल ज्यावर ट्रेडमार्क आहे. त्याचा वापर तुम्ही व्हिडिओत करू शकत नाही. एखाद्या पेड सॉफ्टवेअरला फ्रीमध्ये डाऊनलोड करणे शिकवत असाल तर अशावेळीही कॉपी राइट येतो. जर तुम्ही लाईव्ह स्ट्रीम करत असाल आणि अशी दृश्ये जी कॉपीराइटचं उल्लंघन करणारी असतील तर तेव्हाही युट्यूब एक्शन घेते.

कॉपीराइट स्ट्राइक हटवण्याचा केवळ एक पर्याय आहे, ज्यात तुम्हाला एकतर व्हिडिओ डिलीट करावा लागेल किंवा युट्यूबला तुमच्या व्हिडिओबाबत स्पष्टीकरण द्यावे लागेल. तुम्ही वापरेलेले फुटेज अथवा इतर बाबी फ्री कॉपीराईट आहेत हे त्यांना स्पष्ट करावे लागेल.जर तुम्ही तुमच्या युट्यूब स्ट्राइककडे दुर्लक्ष करत असाल तर युट्यूब तुमच्या चॅनेलवर बंदी आणू शकते. कॉपीराइट ओनरशी संपर्क साधा. व्हिडिओ डीलिट करण्याआधी तुमचा व्हिडिओ कॉपीराइट फ्री आहे का याची पडताळणी करा.

त्यानंतर स्ट्राइक एक्सेप्ट करून कॉपीराइट स्कूल अटेंड करा. याठिकाणी तुम्ही कॉपीराइट ओनरशी ज्याने क्लेम केला आहे त्याच्याशी संपर्क करू शकता. त्यासाठी जर तुमचं चॅनेल असेल तर तुम्ही युट्यूब पार्टनर प्रोग्राममध्ये सहभागी होऊ शकता. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ७ दिवसांचा वेळ दिला जातो. लक्षात ठेवा, चॅनेलला युट्यूबकडून कॉपीराइट उल्लंघनाचे ३ स्ट्राइक मिळाले तर तुम्हाला ७ दिवसांत व्हिडिओ हटवावे लागतात किंवा त्या पार्टला रिमूव्ह करावे लागते. जर तुम्ही असे केले नाही तर तुमचे चॅनेल बंद केले जाते.

# चित्रपट कथाकार, दिग्दर्शक दिनकर पाटील



**निमित्त**

दिनकर दत्ताजी पाटील यांचा जन्म ६ नोव्हेंबर १९१५ रोजी चिकोडी तालुक्यातल्या बेनाडी या गावी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्याच गावात झाले, मात्र आध्यात्मिक शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आपल्या मामाकडे आले आणि त्यांनी विद्यापीठ हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. विनायक हे दिनकर पाटील यांच्या वर्गाला मराठी शिकवत. त्या काळात गजानन जागीरदारही या शाळेत शिक्षक म्हणून काम करत. त्या काळात वि.स. खांडेकर आणि ना.सी. फडके हे विद्यार्थ्यांचे आवडते लेखक होते. विद्यापीठ हायस्कूलमधील साहित्यप्रेमी विद्यार्थी दर रविवारी मा. विनायक यांच्याकडे जमत. मा. विनायक 'किर्लोस्कर'मध्ये छापून आलेल्या फडके आणि खांडेकर यांच्या कथा त्यांना वाचून दाखवत. अशा प्रकारे दिनकर पाटील यांच्यामधील साहित्यिक घडण्यास सुरुवात झाली.

उच्च शिक्षणासाठी दिनकर पाटील यांनी राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतला. महाविद्यालयाच्या 'राजारामीयन' मासिकाचे संपादक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. ना.सी. फडके यांच्याबरोबर कवी माधव ज्युलियनही या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत होते. या मोठ्या साहित्यिकांच्या प्रभावाने दिनकर पाटील यांनी लिहिण्यास सुरुवात केली. 'सेवक', 'सत्यवादी' या वृत्तपत्रातून लेखन करण्यास त्यांनी सुरुवात केली. लवकरच 'किर्लोस्कर' मासिकाच्या कथास्पर्धेत दिनकर पाटील यांच्या 'एरीना' या कथेला प्रथम पारितोषिक मिळाले आणि लेखक म्हणून त्यांना मान्यता मिळाली.

दिनकर द. पाटील हे मान्यताप्राप्त पटकथाकार झाले. वि.स. खांडेकर, ना.सी. फडके यांसारखे लेखक जरी त्यांचे आवडते असले, तरी चित्रपटाचे संवाद लिहिताना त्यांना भालजी पेंढारकरांची शैली जवळची वाटली. 'माझं शिष्यत्व सांगणारे कोणी असोत किंवा नसोत, पण माझा खरा शिष्य कोणी शोभत असेल तर दिनकर पाटीलच.' असे भालजी पेंढारकरांनी म्हटले होते, पण दिग्दर्शनाच्या बाबतीत मात्र दिनकरराव हे 'विनायकरावांच्या' परंपरेतील विद्यार्थी होते.

दिनकर पाटील जवळपास पन्नास वर्ष चित्रपट क्षेत्रात कार्यरत होते. त्या काळात सुमारे १००हून जास्त चित्रपटांचे लेखन, ३५ चित्रपटांचे दिग्दर्शन त्यांनी केले. १० अनुबोधपट तयार केले. या व्यतिरिक्त पाच नाटके, दोन एकांकिका, चार कथासंग्रह, चार व्यक्तिचित्र संग्रह, आणि 'रुपेरी पडदा तंत्रमंत्र' अशी मोठी मजल त्यांनी मारली. 'पाटलाचं पोरं' हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले. १९५३ साली त्यांनी दिनकर चित्र संस्थेची स्थापना केली. दिनकर पाटील यांनी मराठी चित्रपट क्षेत्रात 'ग्रामीण चित्रपटांची' मोलाची भर घातली आणि चित्रपट रसिकांच्या मनात वेगळे स्थान मिळवले. 'उमज पडेल तर' (१९६०), 'प्रेम आंधळं असतं' (१९६२) व 'ते माझे घर' (१९६३) या दिनकर पाटील यांच्या चित्रपटांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. 'कुंकू माझं भाग्याचं' या चित्रपटाला फिल्मफेअर अ‍ॅवार्ड मिळाले. दिनकर पाटील यांनी त्यापूर्वीच १९५४ साली 'तारका' हा चित्रपट व्यवसायावरचा पहिला चित्रपट काढला होता आणि १९५५ साली भिकार्यांच्या जीवनावरचा 'मूठभर चणे' या चित्रपटांसाठी त्यांना १९८२ साली ग.दि. माडगूळकर पुरस्कार, १९९८ साली जनकवी पी. सावळाराम पुरस्कार आणि १९९८ सालचा चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कार मिळाला होता. मराठी चित्रपट महामंडळाने 'चित्रभूषण' अशी पदवी त्यांना बहाल करून त्यांचा सन्मान केला होता. वयाच्या ८९व्या वर्षी कोल्हापूर येथे २१ मार्च २००५ रोजी त्यांचे निधन झाले.

**-स्नेहा अवसरीकर**

## क्लिक...क्लिक...!




**सिंधुदुर्ग : नोव्हेंबर महिना उजाडला असला तरी ऑक्टोबर हिटचे चटके जाणवत आहेत. अंगाची लाही लाही होत असल्याने देवगडमधील एका छोट्या तलावात डुबकी मारणाऱ्या मुलाचे शुभम करपे यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# थंडीमध्ये आहारात या भाज्यांचा करा समावेश

सध्या हिवाळ्याचे दिवस सुरू आहेत. थंडीच्या या दिवसांमध्ये स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे खूप गरजेचे आहे. तसेच निरोगी राहण्यासाठी थंडीच्या दिवसांमध्ये आपल्या शरीरात विटामिन ए असणे आवश्यक आहे. विटामिन ए मुळे आपली त्वचा निरोगी राहते, पण आपल्या शरीरात जर विटामिन ए ची कमतरता असेल तर एनीमिया, कर्करोगाचा धोका वाढतो. त्यामुळे अशा दिवसांमध्ये निरोगी राहणे खूप गरजेचे आहे.



**टोमॅटो** – टोमॅटो हा आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असतो. टोमॅटो खाल्ल्यामुळे आपल्या शरीराला विटामिन ए मिळण्यास मदत होते तसेच टोमॅटोमध्ये अँटीऑक्सिडंट्स देखील असतात त्यामुळे टोमॅटो खाल्ल्यामुळे शरीरातील विटामिन ए ची कमतरता भरून काढते. ज्यामुळे कर्करोगाचा धोका कमी होतो. तसेच टोमॅटो खाल्ल्यामुळे रक्तातील साखरही नियंत्रणात राहण्यास मदत होते.

**गाजर** – गाजर हे खायला चविष्ट लागते. सोबतच ते आपल्या शरीरासाठी फायदेशीरदेखील ठरते. गाजरामध्ये विटामिन ए सर्वाधिक आढळते. जर तुम्ही दररोज एक वाटी गाजर खाल्ले, तर तुमच्या शरीरातील ए जीवनसत्वाची ३३४ टक्के कमतरता भरून काढता येते. त्यामुळे तुम्ही गाजराची कोशिंबीर किंवा गाजराची भाजी म्हणून तुमच्या आहारात समावेश करू शकता.

**रताळे** – बहुतेक लोकांना रताळे खायला आवडते. तर याच रताळ्यामध्ये विटामिन ए मोठ्या प्रमाणात आढळते तसेच लहान मुलांसाठी रताळे खूप फायदेशीर असते. त्यामुळे दररोज तुम्ही तुमच्या आहारात एक ते दोन रताळ्यांचे समावेश करणे आवश्यक आहे.

**भोपळा** – बहुतेक लोकांना भोपळा खायला आवडत नाही, पण हाच भोपळा तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतो. भोपळ्यामध्ये काही असे गुणधर्म असतात जे आपली रोगप्रतिकार शक्ती सुधारण्यास मदत करतात तसेच भोपळा खाल्ल्यामुळे आपल्या शरीरात विटामिन ए ची कमतरता भासत नाही. त्यामुळे भोपळा खाणं खूप गरजेचे आहे.


**कोथिंबीर** – तुम्ही तुमच्या आहारात कोथिंबीरचा समावेश करणं खूप गरजेचं आहे, कारण कोथिंबीर खाल्ल्यामुळे शरीरात विटामिन ए ची कमतरता भासत नाही तसेच कोथिंबीरमध्ये अँटिऑक्सिडंटचे प्रमाणदेखील जास्त असते. त्यामुळे तुम्ही भाजीमध्ये किंवा भातामध्ये किंवा पराठ्यामध्ये कोथिंबिरीचा समावेश करू शकता.

# खालापुरात मतदान प्रक्रिया सुरळीत

## २२ ग्रामपंचायतींचा आठ फेऱ्यांत निकाल लागणार

**खोपोली : प्रतिनिधी**

तालुक्यात महिनाभरापासून निवडणुकीचा उडालेला धुरळा रविवारी मतदानानंतर विसावला असून ३५९ जण सदस्यपदासाठी तर सरपंचपदासाठी ६० जणांचे भविष्य मतदान यंत्रात बंद झाले आहे.



तालुक्यातील तांबाटी, जांभिवली (छत्तीशी) नंदनपाडा, ठाणेन्हावे, होनाड, वावर्ले, वरोसे, बोरगाव (खु.) जांबरुग, माणकिवली, वासांबे, चांभार्ली, माजगाव, इसांबे, सावरोली, कुंभिवली, आत्करगाव, खानाव, चिलठण, नारंगी, शिरवली (छत्तीशी ) बीडखुर्द या ग्रामपंचायतीमध्ये रविवारी मतदान पार पडले. सोमवारी (दि. ६) निकाल असल्याने धाकधूक वाढली आहे. खालापूर तहसील आवारात नेताजी पालकर सभागृहात मतमोजणी होणार आहे. सकाळी १० वा. मतमोजणी सुरू होणार आहे.

दहा टेबल मतमोजणी होणार आहे. एका वेळी तीन ग्रामपंचायतची मतमोजणी होणार आहे. आठव्या फेरीत संपूर्ण निकाल स्पष्ट होणार आहे. सर्वाधिक मतदार असलेल्या वासांबे ग्रामपंचायत निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले असून राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हा परिषद महिला बालकल्याण सभापती ऊमा मुंढे या थेट सरपंचपदासाठी निवडणूक लढवत असल्याने जिल्ह्याचे लक्ष या लढतीकडे आहे, तसेच तालुक्यातील सावरोली व तांबाटी या मोठ्या ग्रामपंचायत निकालाकडेही जिल्ह्याचे लक्ष लागून लागले आहे.

# गर्भलिंग निदान चाचणीविरोधी कायद्यांची कठोर अंमलबजावणी व्हायला हवी -डॉ. निलम गोऱ्हे




**अलिबाग : प्रतिनिधी**

सरकारच्या महिलापुरक धोरण, कायदा तसेच लेक लाडकीसारख्या योजनांमुळे राज्यातील मुलींचा जन्मदर ९२९वरून ९६८पर्यंत सुधारला आहे. यात अधिक सुधारणा करण्यासाठी गर्भलिंग निदान चाचणीविरोधी कायद्यांची कठोर अमंलबजावणी व्हायला हवी असे मत विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.

अलिबाग येथे शिवसेना महिला आघाडीच्या वतीने आयोजित उद्यम सखी दिवाळी महोत्सवात डॉ. निलम गोऱ्हे बोलत होत्या. या वेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य मानसी दळवी, आदिती दळवी, महिला जिल्हाप्रमुख शुभांगी करडे तसेच रायगड जिल्हा महिला संघटिका प्रा. संजीवनी नाईक, कामगार नेते दिपक रानवडे, महिला आघाडी तालुका प्रमुख स्मिता चव्हाण, संकेत नाईक आदी उपस्थित होते.

उपसभापती नीलम गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, उद्यम सखीच्या माध्यमातून पर्यटकांना बाजारपेठ मिळावी यासाठी अलिबागमधील महिला कौतुकास्पद काम करीत आहेत. त्यामुळे अलिबागमध्ये महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालाला कायमस्वरूपी सुविधा केंद्र उपलब्ध व्हावे, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार महेंद्र दळवी यांनी, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना महिलांपर्यंत पोहचविण्याची गरज आहे. महिलांचे मनोबल वाढविण्याचे काम अशा मंचातेफे केले जाईल, अशी ग्वाही दिली. महिलांमध्ये अनेक उद्योजिका आहेत, पण त्यांना पाठबळ मिळत नाही. प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे व्यासपीठ महिलांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे दळवी यांनी यावेळी सांगितले. प्रस्तावना प्रा. संजीवनी नाईक, सूत्रसंचलन प्रतीम सुतार तर आभारप्रदर्शन दिपक रानवडे यांनी केले.

# सुधागडात १२ ग्रामपंचायत निवडणुकांसाठी मतदान

## दहिगाव ग्रामपंचायत ठरली बिनविरोध

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात १२ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी रविवारी (दि. ५) मतदान झाले. या वेळी मुंबई, ठाणे, पुणे व इतर शहरांत कामानिमित्त स्थलांतरित झालेल्या मतदारांनी येऊन मतदानाचा हक्क बजावला. याबरोबरच अनेक नवमतदारांनीही मतदान केले.

गोमाशी, महागाव व दहीगाव या ग्रामपंचायतीमधून सरपंचपदासाठी एकच अर्ज दाखल झाले असल्याने ते बिनविरोध निवडून आले, तसेच सर्व सदस्यदेखील बिनविरोध निवडून आले आहेत.

सकाळपासून मतदान केंद्रावर गर्दी होती. अनेक मतदार मतदान करून जात होते. बहुतांश ठिकाणी दुपारी १२ वा. नंतर ५० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान झाले होते. कार्यकर्त्यांची मतदारांना आणण्याची लगबग सुरू होती.



### रासळमध्ये कांटे की टक्कर!

*तालुक्यातील श्रीमंत असलेली रासळ ग्रामपंचायतमध्ये प्रतिष्ठेची लढत आहे. सरपंचपदाचे दोन्ही उमेदवार एकमेकांना तोडीस तोड आहेत. कोणाचे पारडे जड होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या निवडणुकीत काही ग्रामस्थ व विरोधकांनी तत्कालीन सरपंच व सदस्यांवर भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे, तर त्यांनी हे सर्व आरोप खोडून काढत विरोधक विरोधाला विरोध म्हणून केवळ राजकीय सूडबुद्धीने हे आरोप करीत असल्याचे सांगितले आहे.*

शहरातील मतदार आदल्या दिवशीच आपल्या गावी दाखल झाले होते. काहींनी सकाळीच मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजाबला व शहराकडे परतले, तर काही दुपारून मतदान केंद्रावर गेले. या मतदारांना आणण्याची व सोडण्याची व्यवस्थादेखील करण्यात आली होती.

**मागील कित्येक वर्षे गावातील निवडणूक बिनविरोध झाली होती. त्यामुळे मतदानासाठी गावी यावे लागले नाही. यंदा तब्बल १५ वर्षांनी मतदानाचा हक्क बजावला. खूप आनंद होत आहे.**

**-आदेश खैरे, नांदगाव, रहिवासी ठाणे**

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# भाले ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस जिंकणार : बाबूशेठ खानविलकर

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील भाले ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच जिंकेल, असा दावा महाड विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर यांनी केला.

माणगाव तालुक्यातील भाले ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी रविवारी मतदान झाल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे महाड विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर म्हणाले की, निजामपूर विभागात खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, स्व. रावसाहेब खानविलकर यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची विकासकामे झाली आहेत. येथील जनता जनार्दन नेहमीच वेगवेगळ्या निवडणुकांच्या माध्यमातून तटकरे कुटुंबीय व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत राहिली आहे. या निजामपूर विभागातील भाले ही ग्रामपंचायत असल्याने या ग्रामपंचायतीतही मागील १५ वर्षांच्या कालावधीत मोठ्याप्रमाणात विकासकामे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत तटकरे कुटुंबियांनी केली आहेत.

विरोधकांचे भाले ग्रामपंचायतीत कोणतेही विकासकाम काम नाही.

राष्ट्रवादीने केलेल्या विविध विकासकामांमुळे भाले ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला प्रचारादरम्यान जनतेचा उस्फूर्त असा प्रतिसाद लाभला. त्यामुळे भाले ग्रामपंचायतीवर आमचे सरपंचपदाचे उमेदवार यांच्यासह सदस्य निवडून येतील असा दावा त्यांनी केला.

# माथेरानमध्ये एक दिवसआड पाणीपुरवठा

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

पर्यटनस्थळ माथेरानला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी पुरवठा करतात, मात्र सध्या शारलोट तलावाजवळील पंपिंग हाऊसमधील पाणी उचलणारे पंप, मोटार नादुरुस्त झाल्यामुळे त्या दुरुस्त होईपर्यंत एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. माथेरानमधील शारलोट तलावातील पाणीउपासा बंद असून नेरळ कुंभे येथील पाणी माथेरानला आणले जात आहे. २४ तास पंपिंग करून माथेरानला जितकी गरज आहे तितके पाणी येत नसल्याचे प्राधिकरणाकडून सांगितले जात आहे. त्यामुळे प्राधिकरणाकडून एक दिवसाआड पाणी पुरवठा केला जात आहे. याचा परिणाम पर्यटन व्यवसायावर होत आहे.




माथेरान शारलोट तलावाची पाण्याची पातळी २ नोव्हेंबर रोजी फक्त ४६.२० फूट इतकी असून पावसाळ्यापूर्वी १३ मार्च २०२३ रोजीला सदरची ४६.२० फूट ही पाण्याची पातळी होती. जर का माथेरानमध्ये योग्यरितीने पाणीपुरवठा झाला नाही तर त्याचा विपरीत परिणाम पर्यटन हंगामावर होऊन स्थानिकांना आर्थिक संकटाला सामोरे जाऊ लागू शकते. यावर त्वरित निर्णय घेऊन यावर काम करावे, असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

# ना. आदिती तटकरेंकडून रोहा भाजी मार्केटची पाहणी

## विक्रेत्यांच्या समस्या घेतल्या जाणून

**रोहे : प्रतिनिधी**

महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी (दि. ४) सायंकाळी रोहा शहरातील भाजी मार्केटला भेट दिली. या वेळी त्यांनी भाजी भाजी विक्रेत्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.



या वेळी माजी गटनेते महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, अमित उकडे, रवी चाळके, माझ सवाल, स्वप्निल धनावडे आदी उपस्थित होते.

रोहा शहरातील भाजी मार्केटमधील समस्या जाणून घेण्यासाठी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी शनिवारी सायंकाळी भाजी मार्केटला भेट दिली. या वेळी ना. आदिती तटकरे यांनी उपस्थित भाजी विक्रेत्यांचे समस्या जाणून घेतल्या. भाजी मार्केटमध्ये रस्त्यावर मधोमध भाजीचे दुकान थाटणे यांसह अन्य तक्रारी ना. आदिती तटकरे यांच्यासमोर विक्रेत्यांनी मांडल्या.

ना. आदिती तटकरे यांनी नगर परिषद प्रशासनाने या विषयाकडे लक्ष देऊन तक्रारी व भाजी मार्केटमधील सोडविण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक व नगर परिषदेचे अधिकारी उपस्थित होते.

# चला साजरी करू पर्यावरणस्नेही दिवाळी!

## रायगडात फटाकेमुक्त दिवाळी अभियान



**पाली : प्रतिनिधी**

तिमिरातून तेजाकडे नेणारा, नवी उर्जा, प्रकाश, आनंद, उत्साह, नवचेतना देणारा आणि विवेक जागृत ठेवणारा सण म्हणजे दिवाळी. या आनंदावर बऱ्याचवेळा फटाक्यांच्या दुष्परिणामामुळे विरजण पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे टाळण्यासाठी मागील २० वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती फटाकेमुक्त दिवाळी अभियान राबवित आहे. यासाठी जनजागृती, पुस्तक स्टॉल, सेल्फी पॉईंट, पत्रके वाटप आदी उपक्रम राबविले जात आहेत.

महा. अंनिसबरोबरच विविध सामाजिक संघटना, काही पर्यावरणप्रेमी लोक, समाजसेवक आणि जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयातूनदेखील पर्यावरणस्नेही दिवाळीसाठी प्रभावी जनजागृती केली जात आहे.

फटाके फोडण्याऐवजी मुलांना किल्ले बांधणी, आकाश कंदिल व भेटकार्ड बनविणे, रांगोळी काढणे अशा रचनात्मक उपक्रमात सहभागी करून घेत आहेत, तसेच फटाक्याचे पैसे वाचवून त्या पैशात अवांतर वाचनाची पुस्तके विकत घेण्यास मुलांना प्रोत्साहित केले जातांना दिसत आहे.

**महाराष्ट्र 'अंनिस'मार्फत राबविल्या जाणाऱ्या फटाकेमुक्त दिवाळी अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत आहे, तसेच सर्वांनी फक्त दिवाळीतच नाही तर वेगवेगळ्या धर्मातील सणांच्या दिवशी, निवडणुका, मिरवणूक, नेत्यांचे वाढदिवस अशा प्रसंगी प्रदूषणकारी फटाक्यांचा वापर टाळावा.**

**-मोहन भोईर, जिल्हा कार्याध्यक्ष, अंनिस**

**यंदाच्या वर्षी फटाके स्टॉल दुकानांच्या जवळ पुस्तक विक्रेचे स्टॉल लावले आहेत. जनजागृती करणारी पत्रक वाटली जात आहेत. याशिवाय फटाकेमुक्त दिवाळी व पर्यावरणस्नेही दिवाळी साजरी करण्याचे संदेश असलेला सेल्फी पॉईंट तयार केला आहे. याठिकाणी अनेक जण येऊन सेल्फी काढत आहेत व फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचा संकल्प करीत आहे.**

**-महेंद्र नाईक, प्रधान सचिव, पनवेल, अंनिस**

# खोपोलीत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**खोपोली : प्रतिनिधी**

अबालवृद्ध आणि समाजातील शेवटच्या घटकातील लोकांची मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर गार्गी एचए. प्रा. लि. कंपनी, लायन्स क्लब ऑफ खोपोली आणि शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. खोपोलीतील डॉ. रामहरी धोटे सभागृह तथा लायन्स सर्विस सेंटर येथे हे शिबिर झाले.

यात ४७ ज्येष्ठ नागरिकांचे डोळे तपासणी करण्यात आली. त्यामधील सात जणांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच १४ वर्षीय दृष्टीहीन मुलगा नेत्र तपासणी शिबिरात आला होता त्याच्यावरही शस्त्रक्रिया करून दृष्टि परत आणण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

शिबिराचे उद्घाटन गार्गी एच.ए.प्रा.लि.कंपनीचे व्यवस्थापक राजू गावडे, लायन्स क्बल ऑफ खोपोलीचे अध्यक्ष अतिक खोत, सेक्रेटरी दिपाली टेलर, प्रोजेक्ट चेअरमन अल्पेश शहा, विकास खुरपुडे, शिल्पा मोदी, खेमंत टेलर, शेखर जांभळे, नारायण कट्टी, सुजित पडवळकर, शंकरा आय हॉस्पिटलचे प्रकाश पाटील, डॉक्टर्ससह लायन्स सदस्य उपस्थित होते. नेत्र तपासणी शिबिराला माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील यांनीही भेट देवून आयोजकांचे कौतुक केले.

**मा. पवार सो कोर्ट**
Adv. Vishal V. Jaju
Exh. No. N 7/ D

## PAPER NOTICE

**IN THE COURT OF L.D.CIVIL JUDGE SENIOR DIVISION, PANVEL,AT PANVEL**

CMA NO.

**MRS. KRISHNA SENGUPTA** )....Applicant

V/S

**MR. ANINDYA SENGUPTA &2 OTHERS** )... Opponents

The Applicant states that **MR. ASHIT KUMAR SENGUPTA** died at Sonoscan Hospital Pvt Ltd. Municipality English Bazar, Malda, West Bengal on 09th February, 2023.

**SCHEDULE OF PROPERTY**

a. Flat bearing No. C-302, on 3rd Floor, in the building known as Crystal Court CHS Ltd., Plot No. 18/27, situated at Sector-7, Khaghar- Navi Mumbai 410210, along with shares bearing No. 586 to 590 (both inclusive) amounting to Rs. 50/- each of Crystal Court CHS Ltd., Kharghar

It is stated that the above mentioned property of the deceased will be transferred to the Applicant. We are publishing the same in the local newspaper. If any person has objection, he can raise the said objection within the period of 30 days, failing which the court will grant the Heirship Certificate in the name of Applicant.

Date: 12/9/2023

court seal

**Sd/-**
**Assit. Supt.**
**C.J.S.D. Panvel**

## निवडक

### सिंधुदुर्ग जिल्हा संघाचा वर्धापन दिन



**पनवेल** : सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ पनवेल संस्थेचा ३६ वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संघाच्या कार्यालयात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सिंधुदुर्ग सांस्कृतिक कलामंचतर्फे प्रसन्न कुमार घागरे यांच्या नेतृत्वाखाली संगीतमय भक्ती गीतांचा स्वर संध्या कार्यक्रम सादर करण्यात आला. या वेळी प्रदीप रावले संवादिनी, अनिल नेमलेकर, रंगनाथ नेरूरकर तबला, संकेत पवार, रवींद्र खोबरेकर यांनी पखवाज साथ केली. डॉ. भगवान बिरमोळे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, एसीपी विनोद चव्हाण आदी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर, ॲड. मनोज भुजबळ, प्रभाकर कांबळे, तसेच भाजप महिला अध्यक्ष राजश्री वावेकर, ज्येष्ठ पत्रकार लेखक दिलीप रेडकर यांनी या वेळी आपली उपस्थिती दर्शवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभवी मराळ यांनी केले. रात्री प्रदीप रावले, हरिश्चंद्र पालव, प्रभाकर येरम आणि सहकाऱ्यांनी सुस्वर भजने सादर केली.

### वाशी कार्यालय ठरले सर्वोत्कृष्ट




**नवी मुंबई** : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना प्रादेशिक कार्यालय वाशी यांना स्थापना दिनी झोनमधील सेवा वितरण क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट प्रादेशिक कार्यालयाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ईपीएफओ प्रादेशिक कार्यालय वाशीच्या वतीने मराठी साहित्य संस्कृती आणि कला मंडळ सभागृह, नवी मुंबई, वाशी येथे ईपीएफओचा ७१ वा स्थापना दिन साजरा करण्यात आला. आयकर विभागाच्या प्रधान आयुक्त दिव्या बाजपेयी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी विभागीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान यांनी विभागातील सर्वोत्कृष्ट प्रादेशिक कार्यालयाचा मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कर्मचारी व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. या वेळी प्रादेशिक भविष्य निर्वाहनिधी आयुक्त आयुष गौतम, प्रादेशिक भविष्य निर्वाहनिधी आयुक्त देवेंद्र सोनटक्के उपस्थित होते.

### डाऊरनगर शाळेस खुर्च्यांची भेट

**उरण** : निपुण भारत अभियानांतर्गत माता पालक संघाच्या होणाऱ्या शैक्षणिक सभात महिला भगिनींना बसण्याची सोय व्हावी म्हणून वुई क्लब ऑफ वूमन द्रोणागिरी आणि तृप्ती सुधीर सुर्वे फाऊंडेशन उरण यांच्या संयुक्त विद्यमानाने डाऊरनगर शाळेस नुकताच ५० खुर्च्यांची भेट देण्यात आली. या वेळी वुई क्लबच्या अध्यक्ष श्लोक पाटील, खजिनदार आरती ढोले, स्व. तृप्ती सुर्वे फाउंडेशनच्या अध्यक्षा कल्पना सुर्वे, नम्रता पाटील, शुभांगी शिंदे, मुख्याध्यापक श्रीकांत माने, शिक्षकवृंद उपस्थित होते. मान्यवरांचे तंबाखूविरोधी चळवळीवर अधारीत असणारे मच्छिंद्र म्हात्रे यांनी लिहिलेले जागर तंबाखूमुक्तीचा हे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाट्यदिग्दर्शक किशोर पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी कैलास भोईर यांनी विशेष प्रयत्न केले.



# लोकसहभागातून स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अभियान

## नवी मुंबई महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छता आणि सुशोभिकरणामध्ये आघाडीवर असणारे शहर ही नवी मुंबईची ओळख असून ती सातत्यपूर्ण कामांमुळेच दृढ झालेली आहे. काही दिवसांवर आलेल्या दिवाळी सणाच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, भारत सरकारच्या सहसचिव तथा स्वच्छ भारत मिशनच्या संचालक रूपा मिश्रा यांनी राष्ट्रीय पातळीवर घेतलेल्या वेबसंवादामध्ये ‘स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी’ ही नवी मोहीम दीपावली कालावधीत राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यास अनुसरून आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेने त्वरित नियोजन करीत प्राप्त सूचनांच्या अनुषंगाने दिवाळी कालावधीच्या आधीपासूनच विविध उपक्रम राबविण्याच्या अंमलबजावणीस सुरुवात केली आहे.

स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी ही मोहीम राबविताना स्वच्छतेमधील अत्यंत महत्त्वाच्या स्वच्छतामित्रांच्या आरोग्याची काळजी घेत त्यांना मास्क वितरित करण्याचे सूचित करण्यात आले होते. त्यानुसार महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते सफाईकर्मींना प्रातिनिधिक स्वरूपात मास्क वितरण करून या कार्यवाहीला प्रारंभ करण्यात आला.

या वेळी आयुक्तांनी काम करताना मास्कचा वापर करण्याचे आवाहन स्वच्छताकर्मींना केले. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नवी मुंबई मनपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय गडदे आणि इतर अधिकारी उपस्थित होते. सर्व सफाईकर्मींना मास्क वितरित केले जात आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने लोकसहभागातून दिवाळी स्वाक्षरी मोहीम, प्लास्टिक प्रतिबंध व पर्यायी कापडी पिशव्या वापरण्याविषयी व्यापक जनजागृती व मोहीम, इकोफ्रेंडली लोकल प्रॉडक्ट्सचा वापर असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याबाबतचे नियोजन महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून नागरिकांनी यामध्ये सहभागी होऊन स्वच्छता हीच लक्ष्मी अशी आपली भारतीय परंपरेची शिकवण लक्षात घेऊन शहर स्वच्छतेत योगदान द्यावे असे आवाहन आयुक्तांमार्फत सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देत करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दिवाळीपूर्वी आपल्या घराची साफसफाई करताना नागरिकांनी आपल्याला नको असलेल्या, टाकून देणार आहात अशा वस्तू नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ९२ ठिकाणी उभारलेल्या ‘थ्री आर’ सेंटरमध्ये आणून ठेवाव्यात जेणेकरून त्या गरजूंपर्यंत पोहचून त्यांची दिवाळी आनंदात जाईल असेही आवाहन नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नवी मुंबईत आदिवासी भवनाचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबईमधील सीबीडी येथील आदिवासी बांधवांनी आपली संस्कृती जपावी यासाठी सिबीडी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान, सेक्टर-८, येथे आदिवासी बांधवांकरिता आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीमधून आदिवासी भवन उभारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते झाले.

या उद्घाटनाला आदिवासी जीवनशैलीतील नृत्य आणि लोकनृत्याचा अनोखा संग्राम जपत कमल आनंद कलामंच आणि आशिमिक कामठे प्रस्तुत वारसा माझ्या महाराष्ट्राचा या सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आला होता, तसेच सीबीडी येथील सेक्टर-८मध्ये आदिवासी बांधवांना आदिवासी भवन उभारून दिल्याबद्दल आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठान (नवी मुंबईच्या) वतीने आमदार मंदा म्हात्रे यांचे आभार मानत त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी महापालिका अधिकारी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार म्हसाळ, उपायुक्त समाज विकास विभाग श्रीराम पवार, कार्यकारी अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता विद्युत विभाग संजीव पाटील, उपअभियांत्रिकी अजय पाटील, माजी नगरसेवक साबू डॅनियल, माजी नगरसेविका राधा ठाकूर, सुरेखा नरबागे, माजी नगरसेवक अशोक गुरखे, दिपक पवार, सुनील पाटील, माजी परिवहन सदस्य काशिनाथ पाटील, राजेश राय, समाजसेवक पांडुरंग आमले, भूषण ठाकूर, ॲड. सुहास वेखंडे, ॲड. संतोष पळसकर, जग्गनाथ जगताप, संजय ओबेरॉय, रवी ठाकूर, प्रभाकर कांबळे, सुभाष गायकवाड व आदिवासी बांधव उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयातर्फे बँकेविषयी जागरूकता सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतर्फे शनिवारी (दि. ४) सकाळी ओवेपेठ गावातील रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी तसेच व ओवेपेठ गावातील नागरिकांसाठी बँकेविषयी जागृतापर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रामध्ये महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रा. राहुल कांबळे यांनी व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी न्यू इंग्लिश स्कूलमधील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बँकेमध्ये कसे व्यवहार चालतात, कर्ज पद्धती, तसेच डीडी, चलन भरणे पैसे काढणे, पैसे भरणे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच ओवेपेठ गावातील नागरिकांनासुद्धा बँकेविषयी महत्त्वाची माहिती दिली. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या घेण्यात आला.

या सत्राचे आयोजन डॉ. फारुख शेख वाणिज्य विभाग प्रमुख यांनी केले तसेच डॉ. महादेव चव्हाण, डॉ. कविता शिंदे, प्रा. शिल्पा पाटील तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



# अधिकारी, कर्मचाऱ्यांची बदली नियमबाह्य; चौकशी करण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मनपा आयुक्तांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नुकत्याच बदल्या केल्या, मात्र काही विभाग अधिकाऱ्यांनी आपल्या मर्जीतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मनपाचे लेखी आदेश नसताना आपल्याकडे ठेवले आहे. असे नियमबाह्य वर्तणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी करावी अशी मागणी भाजप कामगार मोर्चा कोकण विभाग उपाध्यक्ष सुधीर पाटील यांनी दिलेल्या पत्रात केली आहे.

आयुक्तांच्या आदेशान्वये मागील काही महिन्यांपूर्वी सामान्य प्रशासनाद्वारे विविध विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या बदल्या तसेच पदोन्नती पदस्थापना करण्यात आल्या, परंतु आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या नकळत काही विभाग अधिकाऱ्यांनी आपल्या मर्जितले अधीक्षक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या विभागाचे कामकाज करण्यासाठी सोपविले आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सुधीर पाटील यांनी केली आहे.

# नवी मुंबईतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक घसरला

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जल वा वायू कोणत्याही प्रकारचे प्रदूषण घातकच असते. त्यावर नियंत्रणासाठी विविध उपाययोजना केल्या जातात, परंतु आता शहरातील वाढत्या प्रदूषणाने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. शहरातील नेरुळ सह काही विभागात तर हवेतील गुणवत्ता खालावली असून प्रदूषणात मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. आता सध्याच्या हिटमध्ये पुन्हा एकदा हवेतील गुणवत्ता ढासळण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी, पुन्हा एकदा प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी पालिका व प्रदूषण नियंत्रण मंडळासमोर आव्हान उभे ठाकले आहे.

मागील वर्षीच्या ऑक्टोबर पासून हळूहळू हवेतील गुणवत्ता ढासळत गेली. त्यानंतर जानेवारी २०२३पासून हवेतील गुणवत्ता तर कमी कमी होत गेली. मार्चनंतर कडक उन्हाळ्यात सुरुवात झाल्यावर तर हवेतील गुणवत्ता मोठ्या प्रमाणात खराब होत गेली. त्यावेळी तर हवेतील गुणवत्ता बिकट अवस्थेत होती. त्यामुळे हवेतील गुणवत्ता चांगली रहावी, यासाठी पालिकेकडून विविध प्रयत्न केले जात असताना प्रदूषण वाढतच आहे.

औद्योगिक क्षेत्रातून रात्रीच्या वेळी रासायनिक मिश्रित द्रव्य,वायू सोडत आहेत. विविध रासायनिक कंपन्या घातक वायू रात्रीच्या वेळात हवेत सोडतात, नवी मुंबई मनपाकडून विविध रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम चालू असते. त्यातील काही रस्ते उखडले गेले तर काही रस्त्यांचे डांबर देखील निघते. त्यामुळे रस्त्यावर टाकलेली खाडी वाहने जाताना व येत असताना बाहेर पडत असतात. त्यातून धूळदेखील बाहेर फेकली जात आहे. यामुळे सुध्दा हवेतील गुणवत्ता खराब होत असते. दुसरीकडे ठाणे-बेलापूर महामार्ग, सायन-पनवेल महामार्ग आणि पाम बीच महामार्गावरून दररोज लाखो वाहने ये-जा करीत असल्याने दूषित वायू मोठ्या प्रमाणावर हवेत सोडला जातो. त्यामुळे प्रदूषण वाढते.

**सध्या खोकला, सर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याला इतर कारणांबरोबर हवेतील खराब झालेली गुणवत्तादेखील कारणीभूत आहे. या प्रदूषित वातावरणात दमा असलेल्या रुग्णांनादेखील मोठ्या प्रमाणात त्रास होत असतो.त्याचबरोबर गंभीर, अतिगंभीर असलेल्या रुग्णांनी काळजी घेणे गरजेचे असून अशा नागरिकांनी फिल्टर मास वापरावे.**
**डॉ. कैलास गायकवाड,**
**नवी मुंबई मनपा**

**हवेतील गुणवत्ता कशी सुरेख राहिल यासाठी पालिका नेहमीच प्रयत्नशील असते. मागील वर्षीदेखील मनपाने उपाययोजना केली होती. आताही ज्या ठिकाणी जास्त प्रदूषण आहे त्या ठिकाणी धूळ नियंत्रण वाहन फिरवले जाते.**
**-विजय राऊत,**
**कार्यकारी अभियंता,**
**प्रदूषण नियंत्रण विभाग**



(संग्रहित छायाचित्र)

# बच्चेकंपनी रमली किल्ले साकारण्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



दिवाळी आणि किल्ले बनविणे हे समिकरणच गेल्या वर्षांत बनले आहे. दिवाळीत किल्ले बनवण्याची आपल्याकडे मोठी परंपरा आहे. सध्या बच्चे कंपनीपासून तरुणाई अंगणात, सोसायटीच्या आवारात, मैदानात किल्ले बनवण्यात रमलेली दिसते आहे, तर पर्यावरणपूरक रंगीबेरंगी कंदील बनवण्यासाठी काहीजण साहित्याची जमवाजमव करण्यात व्यग्र दिसतात.

सध्या ठिकठिकाणी असणाऱ्या सिमेंटच्या जंगलातही बच्चे कंपनी आणि तरुण पिढी दिवाळीत किल्ले बनविण्याची आपली परंपरा कायम ठेवून आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शाळांना सुटी जाहीर झाल्या आहेत. काही ठिकाणी प्रथम सत्राच्या परीक्षा अंतिम टप्प्यात असल्याने बच्चे कंपनी अभ्यासाबरोबरच किल्ले, कंदील बनवण्यासाठी वेळेचा समन्वय साधत आहेत.


यंदा शाळा-महाविद्यालये, तालुकास्तरावर किल्ले स्पर्धा, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्यात दिवाळीत किल्ले बांधणीला आगळेवेगळे महत्त्व आहे. बाजारपेठेतही तयार किल्ल्यांच्या विविध आकार, प्रकारातील प्रतिकृती विक्रीस उपलब्ध आहेत. याशिवाय किल्ले सजवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिकृती, सिंहासन, मावळे, हत्ती, घोडे, उंट, सैनिक, दीपमाळ आदींनाही मागणी असून मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे.

कागदापासून तसेच विविध प्रकारच्या वस्तूंचा वापर करून लहानगे आकाश कंदील बनविण्यात व्यग्र झाले असून काही शाळांमधून आकाश कंदील बनवण्याचे प्रशिक्षण, स्पर्धाही घेण्यात आल्या आहेत. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मुलांचा उत्साह पाहून पालकही त्यांना मार्गदर्शन करीत आहेत.

**दिवाळीनिमित्त दरवर्षी शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही किल्ले बांधतो. यंदा मित्रांच्या मदतीने किल्ल्याची सुंदर प्रतिकृती तयार केली आहे. लवकरच सजावटही करणार आहोत.**
**-स्वराज मरवडे, विद्यार्थी**

**दिवाळीच्या पार्श्वभूमीवर किल्ले बांधून ऐतिहासिक परंपरा जतन केली जाते. यातून नवीन पिढीला ऐतिहासिक गड-किल्ल्यांची माहिती मिळते, तसेच निर्मितीचा आनंद मिळतो.**
**-श्रीकृष्ण गरदे, शिक्षक**



## तीन लाखांचे ड्रग्ज जप्त

**नवी मुंबई** : मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने भाईंदर पूर्व भागातून सुमारे तीन लाख रुपये किमतीचा एमडी (मॅफेड्रॉन) हा अमली पदार्थ जप्त केला आहे. या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरुन त्यांनी भाईंदर पूर्व येथील गोल्डन नेस्ट ते इंद्रलोक या मार्गावर हनुमान मंदिराजवळ अलकेश रामचंद्र म्हसकर (वय ३९) या संशयिताला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन लाख ९० हजार रुपये किमतीचे एमडी, वजन काटा, दुचाकी, रोख रक्कम व मोबाईल असा चार लाख २० हजारांचा मुद्देमाल आढळून आला. म्हसकर याला अटक करून त्याच्यावर नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# खोपोलीतील मरणासन्न नाट्यगृहाला वाहिली श्रद्धांजली





**खालापूर : प्रतिनिधी**

नऊ वर्षांपूर्वी १६ कोटींचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले खोपोलीतील छत्रपती शाहू महाराज सामाजिक सभागृह व नाट्यगृह संकुलाची स्थिती भयानक बनली आहे. शहरातील सर्वात आकर्षक इमारत व कला, संस्कृतीचे केंद्र असलेले हे सभागृह लोकप्रतिनिधी व प्रशासकीय उदासीनतेचे बळी ठरले असून वर्तमान स्थितीत अखेरची घटका मोजत आहे.

दुरवस्था व दुर्लक्षित बनलेल्या या सभागृहाची डागडुजी व दुरुस्ती होण्यासाठी नाट्यप्रेमी प्रयत्न केले, मात्र वर्षेभरात अपयश आल्याने या सभागृहाला श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते.

सभागृहाची डागडुजी व दुरुस्तीसाठी जवळपास तीन कोटी निधीची आवश्यकता असून यातील दोन कोटी निधीला मंजुरी मिळाली असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. दुसरीकडे या सभागृहावर दर दोन वर्षांनी डागडुजी व दुरुस्तीच्या नावाने वारंवार मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असताना पालिकेकडून मात्र सभागृह व नाट्यगृहांचे व्यवस्थित नियोजन होत नसल्याचा आरोप राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नाट्यप्रेमींकडून केला जात आहे. अशा स्थितीत नवीन निधी खर्च करण्यापूर्वी या नाट्यगृहाच्या पुढील नियोजनासाठी धोरणात्मक निर्णय व ठोस उपाययोजना होण्याची मागणी केली जातेय.





(छाया : अरुण नलावडे)

### असा आहे घटनाक्रम...

* उद्‌घाटन झाल्यावर फक्त अडीच वर्षच येथे नाट्यप्रयोग व अन्य कार्यक्रम संपन्न झाले.
* मागील पाच वर्षांपासून हे नाट्यगृह पूर्णपणे बंद पडले आहे.
* नाट्यगृहातील वातानुकूलित यंत्रे, पंखे, आधुनिक यंत्रसामग्री गायब झाली असून ती चोरी झाल्याची तक्रार पालिकेकडून देण्यात आली. मात्र नंतर या बाबतीत काहीही घडले नाही.
* सुरुवातीचे १६ कोटी, दोन वर्षांनी दीड कोटी, कोविडनंतर पुन्हा काही लाख व आत्ता पुन्हा दोन ते तीन कोटी निधी खर्च प्रस्तावित आहे.

**सुरुवातीचे १६ कोटी तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या दुरुस्ती डागडुजीसाठी अतिरिक्त दोन कोटींच्यावर निधी पालिका कडून खर्च होऊनही या सभागृहाची अवस्था पूर्वीपेक्षा भयानक बनली आहे. हे नाट्यगृह सतत सुरू राहील व येथे कार्यक्रम होण्यासाठी पालिका प्रशासनाने ठोस व धोरणात्मक नियोजन करण्याची गरज आहे.**

**–अनिल वाघमारे,** माहिती अधिकार कार्यकर्ते

**छत्रपती शाहू महाराज सभागृह हे खोपोली शहराचे सांस्कृतिक व कलेचे वैभव आहे. नाट्यप्रेमी व नाट्यप्रयोग आयोजकांचे मत ऐकले असते व त्या त्या वेळी या महत्त्वाच्या वास्तूची दुरुस्ती व देखभाल झाली असती तर आताची भयानक स्थिती निर्माण झाली नसती. हे नाट्यगृह वारंवार निधी खर्च करण्यासाठीचे केंद्र बनले असूनही येथील दुरवस्था कमी होण्याऐवजी वाढत आहे याचा शोध लावण्याची गरज आहे तसेच उपाययोजना व्हावी.**

**–माजी नगरसेवक किशोर पानसरे,** खोपोली

**नाट्यगृह पुन्हा सुस्थितीत आणण्यासाठी डागडुजी व दुरुस्ती आवश्यक आहे. त्या संबंधित अहवाल तयार करण्यात आला असून अपेक्षित खर्चासाठी पाठपुरावा केला जात आहे. यातील काही निधी मंजूर करण्यात आला आहे. निविदा व तांत्रिक प्रक्रिया पूर्णत्वास आल्यावर तातडीने कामाला सुरुवात होईल.**

**–अनुप दुरे-पाटील,** मुख्याधिकारी खोपोली

# महिलांना रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार -मंत्री आदिती तटकरे

## रोह्यात महिला बचत गटांच्या उत्पादनांचे प्रदर्शन



**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात महिला बचत गट सक्षमपणे उभे राहात आहेत आणि या बचत गटांच्या माध्यमातून चांगले उत्पादन होत आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील महिलांना महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने दिपावलीनिमित्त महिला बचत गट निर्मित उत्पादनांचे प्रदर्शन रोह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

या प्रदर्शनात तालुक्यातील महिला बचत गटांचा सहभाग असून उमेदच्या वतीने २१ बचत गट सहभाग झाले आहेत तसेच जिल्ह्यातील बाजारपेठेत महत्त्वाच्या ठिकाणी बचत गटांचे स्टॉल लावण्यात आले आहेत, असे या वेळी मंत्री आदिती तटकरे सांगितले.

या वेळी गटविकास अधिकारी शुभदा पाटील, जिल्हा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सहाय्यक गटविकास अधिकारी महारुद्र फडतरे यांच्यासह बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.



(छाया : महादेव सरसंबे)

# महाड दुर्घटनेत एकुलत्या एका मुलाचा अंत

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी असणाऱ्या रायगडावर जायचे म्हणून दुपारच्या सत्राऐवजी सकाळच्या सत्रात येऊन रायगडावर जाण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या महाड तालुक्यातील चोचिंदे गावातील आदित्य मोरे याचे स्वप्न अखेर अधुरेच राहिले. महाड एमआयडीसीतील ब्ल्यू जेट हेल्थ केअर कंपनीत झालेल्या दुर्घटनेत आदित्यचा मृत्यू झाला आहे.



आदित्य मोरे याचे वडील एका मेडिकलमध्ये काम करतात. एकुलत्या एका मुलाच्या निधनाने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. चोचिंदे गावातील आदित्य मोरे हा २२ वर्षाचा तरुण ब्लू जेट हेल्थ केअर कंपनीत काही महिन्यांपूर्वी कामाला लागला होता. ३ नोव्हेंबर रोजी आदित्यची कामावर जाण्याची ड्युटी दुपारच्या सत्रात होती, मात्र किल्ले रायगडावर जायचे म्हणून त्याने दुपारच्या ऐवजी सकाळच्या सत्रात कामावर जाण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय त्याच्यासाठी काळाचा घाला ठरला.

आदित्य मोरेच्या अचानक जाण्याने मोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आदित्यच्या जाण्याने त्याचे वडील हतबल झाले आहेत. त्यांच्या तोंडून एकही शब्द निघत नाहीए. हे असे अघटीत होईल असे त्यांनादेखील वाटले नव्हते.

### दोन दिवसांपूर्वीच कंपनी जॉईन केली व घात झाला!

*सतीश साळुंखे हा यापूर्वी एम्बायो या कारखान्यात कामाला होता. जेट हेल्थकेअर या कंपनीचे उभारणी सुरू असल्याने नवी संधी मिळण्याच्या आशेने सतीश साळुंखे याने जेट हेल्थकेअर कंपनी जॉईन केली. ही कंपनी जॉईन करून अवघे दोनच दिवस झाले होते. या कंपनीतून नवी आशा पाहणाऱ्या सतीशचे स्वप्नदेखील अपूर्णच राहिले. तोही या दुर्घटनेचा शिकार झाला.*

महाड एमआयडीसीतील ब्ल्यू जेट हेल्थ केअर कंपनीत झालेल्या दुर्घटनेत एकूण ११ जण मृत्यूमुखी पडले असून सात जणांचे मृतदेह बचाव पथकांच्या हाती लागले आहेत.

# भुवन, रातवड ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रवादी बाजी मारेल : विभागीय अध्यक्ष नवगणे

**माणगाव : प्रतिनिधी**

भुवन व रातवड ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच बाजी मारेल, असा विश्वास इंदापूर विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष काका नवगणे यांनी प्रसारमाध्यमांजवळ बोलताना व्यक्त केला.



माणगाव तालुक्यातील इंदापूर विभागातील भुवन व रातवड या राजकीयदृष्ट्या महत्वपूर्ण अशा ग्रामपंचायती म्हणून ओळखल्या जातात. या ग्रामपंचायतींसाठी रविवारी (दि. ५) मतदान झाल्यावर विभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष काका नवगणे यांनी प्रसारमाध्यमांजवळ आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले कि, इंदापूर विभागात खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून कोटच्यवधी रुपयांची विकासकामे झाली आहेत. याच विभागात भुवन व रातवड या ग्रामपंचायती येत असल्याने या ग्रामपंचायतींमध्येही मागील १५ वर्षांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात विकासकामे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत तटकरे कुटुंबीयांनी केली आहेत. भुवन ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे उमेदवार दीपक जाधव यांचाही सतत जनतेशी असणारा संपर्क व गोरगरीब जनतेला मदत करण्याची त्यांची असणारी दानत पाहता भुवनमध्ये ते मोठ्या फरकाने सरपंचपदी निवडून येऊन सदस्यही निवडून येतील. शिवाय रातवड ग्रामपंचायतीचे आमचे सरपंचपदाचे उमेदवार व सदस्य भरघोस मतांनी निवडून येऊन दोन्ही ग्रामपंचायतींवर विकासकामांच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच बाजी मारेल हे १०० टक्के निश्चित असून यावर केवळ शिक्कामोर्तब होणे बाकी आहे.

# कर्जतमधील शेतकऱ्याने घेतले कोहळ्याचे पीक

## एक एकरमधून पाच टन उत्पन्न

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील माले गावात राहणारे प्रगतशील शेतकरी अरुण वेहेले यांनी एक एकर जमिनीत कोहळ्याचे पीक घेतले आहे. यातून त्यांनी पाच टन इतके उत्पन्न घेत दीड लाख रुपयांची कमाई केली आहे. वेहले यांचे शिक्षण बेताचे असून त्यांची ही अनोखी शेती पाहण्यासाठी अनेक शेतकरी येत आहेत. विशेष म्हणजे कोहळ्यावर प्रक्रिया करण्याचा त्यांचा मानस आहे.

अरुण वेहले यांनी आपली पारंपरिक शेती जपली असताना त्यात अनेक प्रयोग करीत आधुनिक शेतीची सांगड घातली आहे. त्यांनी एक एकर जमिनीत लागवड कोहळ्याची लागवड केली. कोहळ्याला मिळणारा भाव तुटपुंजा असल्याने त्यावर प्रक्रिया करीत त्यातून पेठा बनवण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला आहे.

शेती हीच आपली माय समजत तिच्यात काळानुरूप बदल करीत प्रयोगशील शेतकरी म्हणून अरुण वेहले या शेतकऱ्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. वेहले यांचे वडीलदेखील शेतीच करायचे. त्या वेळी भातशेतीतून उत्पन्न जास्त मिळत नसल्याने ते जोडशेती म्हणून टोमॅटोची शेती करायचे, पण त्यातून उत्पन्न कमी आणि खर्च अधिक अशी परिस्थिती होती. त्यामुळे वयाने लहान असलेल्या अरुण वेहले यांना ही गोष्ट खटकली. मोठे होत असताना त्यांनी वडिलांसोबत आपली पारंपरिक शेती सांभाळली. यासोबतच भाजीपाला शेती त्यांनी सुरूच ठेवली. एका बाजूला भातशेती करताना त्यात वेगवेगळे बियाणे लागवड करीत दुसऱ्या बाजूला दुधी, शिराळी, घोसाळी, पडवळ अशी भाजी लागवड त्यांनी केली, तर वेगळे काहीतरी लागवड करण्याचा विचार करीत असताना त्यांनी बहुगुणी कोहळ्याचे पीक घेण्याचे ठरवले. सात वर्षांपूर्वी त्यांनी कोहळ्याची लागवड केली.



(छाया : विजय मांडे)

साधारण एक एकर जागेत वेहले यांनी कोहळ्याच्या पिकाची लागवड केली. कोहळा साधारण भोपळ्याच्या जातीतील असल्याने तो वेलीवर लागतो, मात्र त्याच वजन साधारण दोन ते चार किलोच्या आसपास असल्याने त्यासाठी जो मळा करावा लागतो तो मजबूत असायला हवा. त्यामुळे या सगळ्या संकटावर मात करून सेंद्रिय पद्धतीत वेहले यांनी कोहळ्याची शेती केली. त्यांच्या शेतात आजही वेलींवर चार किलोचे फळ लटकलेले आहे. दिवाळी, दसरा हा कोहळ्याचा हंगाम असतो. त्यामुळे या हंगामात तयार झालेल्या फळातून त्यांना दीड लाख एवढे उत्पन्न होते, तर इतर भाजीपाला आदीतून त्यांचे एकूण वार्षिक उत्पन्न हे साडेतीन लाखांच्या घरात आहे.

पुनर्वाढ झालेल्या कोहळ्याला बाजरात विकायला गेल्यावर दलाल, अडते यांच्याकडून पंधरा ते वीस रुपयेच भाव येतो, तर बाजरात कोहळ्याची किरकोळ विक्री शंभर रुपयांच्या वर होते. काही फळ आम्ही किरकोळ विक्री करतो आणि बाकीची बाजारात द्यावी लागत असल्याचे वेहले सांगतात. बाजारात किंमत कमी येत असल्याने या कोहळ्यावर प्रक्रिया करून ते विक्री करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला आहे. प्रधानमंत्री सूक्ष अन्न प्रक्रिया योजनेतून त्यांना प्रक्रिया उद्योग राबवायचा आहे, मात्र त्यासाठी कृषी विभागात नोंदणी करूनदेखील त्यांना अजून प्रशिक्षण मिळाले नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली आहे.

तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये वेहले हे उत्तम काम करत आहेत. ते प्रयोगशील शेतकरी आहेत. त्यांना कृषी विभाग कायम मदत करतो, तर तालुक्यात मोठ्या प्रमाणात कोहळा शेती एकमेव वेहले यांनी केली आहे. कोहळा इतर ठिकाणीदेखील करतात, मात्र तो गरजेपुरता एक-दोन वेलींची लागवड होते. वेहले त्यातून उत्पन्न घेत आहेत. त्यांनी कोहळ्यावर प्रक्रिया करण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. प्रशिक्षणाशिवाय ते शक्य नाही. कोहळा प्रक्रिया उद्योगासाठी अजून तरी जिल्ह्यातून कोणी शेतकरी पुढे आले नाहीत. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण होऊ शकले नाही, मात्र प्रशिक्षण होऊन वेहले यांनी इतर शेतकऱ्यांपुढे कोहळा शेतीचा आदर्श निर्माण करावा. यासाठी कृषी विभाग त्यांच्यासोबत आहे, असे तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड यांनी सांगितले.

### हे आहेत विविध गुणधर्म..

*भोपळ्यासारखे दिसणारे कोहळा फळ अंड्याच्या आकाराचे, पण साधारण दहा-बारा पट मोठे असते. ताज्या फळावर पांढरी दाट लव असते. काही काळाने ही लव गळून जाते. कोहळा हिरव्या रंगाचा असतो. पाने खरखरीत असतात, तर फुले पिवळ्या रंगाची असतात. वसंत ऋतूमध्ये फुले येतात. ग्रीष्मात फळे धरतात. ही फळे तयार होईपर्यंत शरद-हेमंत ऋतू उजाडतो. स्वयंपाक, औषधीकरणात तर कोहळा वापरला जातोच, शिवाय यज्ञयागादी कर्मांतही याची आवश्यकता असते. औषधात बहुधा कोहळ्याचे फळ वापरले जाते. कोहळ्याच्या बिया, पाने, मूळ औषधी गुणधर्माचे असतात. कोवळा कोहळा खाण्यास निषिद्ध समजला जातो. पूर्ण वाढ झालेला, तयार झालेला कोहळा वापरण्यास योग्य असतो. असा कोहळा वेलीवरून काढून घेतल्यावर वर्षभर टिकू शकतो.*

**आजवर कृषी विभागाने केलेल्या मदत आणि सल्ल्यामुळे शेतीमध्ये वेगवगेळे प्रयोग करण्यात यशस्वी झालो असून डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनीदेखील वेळोवेळी सहकार्य केले आहे.**

**–अरुण वेहेले,** प्रगतशील शेतकरी

# गतविजेते इंग्लंड वर्ल्डकपबाहेर

## ऑस्ट्रेलियाच्या विजयाने न्यूझीलंडही अडचणीत

**अहमदाबाद : वृत्तसंस्थरा**

यंदाच्या विश्वचषक स्पर्धेतून बाहेर पडणारा इंग्लंड हा पहिला संघ ठरला आहे. ऑस्ट्रेलियाने ३३ धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे. ऑस्ट्रेलियाच्या या विजयाने न्यूझीलंड संघाची उपांत्य फेरीत पोहचण्याची वाट बिकट झाली आहे. पाकिस्तानविरुद्धच्या पराभवाने त्यांच्या अडचणीत आधीच वाढ झाली होती. त्यात ऑस्ट्रेलियाच्या विजयाने आता चौथ्या स्थानी कोणता संघ असणार हे पाहणेदेखील उत्सुकतेचे ठरणार आहे. ॲडम झाम्पाला शानदार कामगिरी केल्याबद्दल सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.



विश्वचषकाच्या ३६व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने इंग्लंडसमोर कडवे आव्हान ठेवले होते. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर दोन्ही संघांमधील हा सामना खेळला गेला. इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. ऑस्ट्रेलियाचा संघ ४९.३ षटकात २८६ धावांवर गारद झाला. इंग्लंडला विजयासाठी २८७ धावा करायच्या होत्या, मात्र त्यांचा संघ २३० धावांत आटोपला. या पराभवासह इंग्लंड उपांत्य फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडला. याबरोबरच ऑस्ट्रेलियाने अंतिम चारमध्ये स्थान मिळवण्याचा दावा मजबूत केला.

ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला २८७ धावांचे लक्ष्य दिले होते. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या ऑसी संघ ४९.३ षटकांत सर्वबाद २८६ धावांवर आटोपला होता. ऑस्ट्रेलियाला शेवटच्या षटकात दोन धक्के बसले. पहिल्याच चेंडूवर ख्रिस वोक्सने ॲडम झाम्पाला जोस बटलरकरवी झेलबाद केले. झाम्पाने १९ चेंडूंत २९ धावा केल्या. या काळात त्याने चार चौकार मारले. तिसऱ्या चेंडूवर वोक्सने मिचेल स्टार्कला बाद केले. स्टार्कने १३ चेंडूत १० धावा केल्या आणि तो मोईन अलीकडे झेलबाद झाला.

ऑस्ट्रेलियन डावात मार्नस लाबुशेनने सर्वाधिक ७१ धावा केल्या. कॅमेरून ग्रीनने ४७, स्टीव्ह स्मिथने ४४, मार्कस स्टॉयनिसने ३५ आणि ॲडम झाम्पाने २९ धावा केल्या. डेव्हिड वॉर्नर १५, ट्रॅव्हिस हेड ११, पॅट कमिन्स आणि मिचेल स्टार्कने प्रत्येकी १० धावा करून बाद झाले. जोश इंग्लिशला केवळ तीन धावा करता आल्या. जोश हेझलवूड एक धाव घेत नाबाद राहिला. इंग्लंडकडून ख्रिस वोक्सने सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. मार्क वूड आणि आदिल रशीदने प्रत्येकी दोन गडी बाद केले. डेव्हिड विली आणि लियाम लिव्हिंगस्टोन यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

२८७ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ ४८.१ षटकांत केवळ २५३ धावाच करू शकला आणि त्यांनी सामना गमावला. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने सर्वाधिक ६४ धावा केल्या. डेव्हिड मलानने ५० आणि मोईन अलीने ४२ धावांचे योगदान दिले. अखेरीस ख्रिस वोक्सने ३२ धावा केल्या आणि आदिल रशीदने २० धावा करीत संघाला विजयाकडे नेण्याचा प्रयत्न केला, मात्र दोघांचे प्रयत्न पुरेसे ठरले नाहीत. ऑस्ट्रेलियाकडून ॲडम झाम्पाने तीन विकेट्स घेतल्या. मिचेल स्टार्क, जोश हेझलवूड, पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. मार्कस स्टॉयनिसला एक विकेट मिळाली.



# जिल्हास्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत 'सीकेटी'ला विजेतेपद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय व रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अंतर्गत पनवेल महापालिकेच्या वतीने जिल्हास्तरीय शालेय थ्रोबॉल स्पर्धा रंगली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी १७ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावले.

या कामगिरीमुळे सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय स्तरावर निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, विद्यालयाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

# 'केबीपी'च्या सर्वेश सोनारला भालाफेकमध्ये सुवर्णपदक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या सर्वेश सोनार या विद्यार्थ्याने मुंबई येथील पॅव्हेलियन मरीन ड्राईव्हमध्ये झालेल्या विभागीय स्तरावरील भालाफेक या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले.

सर्वेश सोनार हा विद्यार्थी पदवी स्तरावरील शिक्षण घेत आहे. यापूर्वीही त्याने भालाफेकमध्ये चमकदार कामगिरी केली आहे. नव्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य. प्रा. सी. डी. भोसले, डॉ. राजेश्री घोरपडे तसेच जिमखाना चेअरमन प्रा. अर्जुन पोटिंदे व जिमखानाप्रमुख प्रा. भास्कर हनवटे यांनी कौतुक आणि अभिनंदन केले.

# नमुंमपा जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने गेली १० वर्ष जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन केले जात आहे. या वर्षी २४९ शाळांमधून ३५ हजारांहून अधिक खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. यापैकी जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धा सीबीडी-बेलापूर वारकरी भवन येथील सुसज्ज सभागृहात झाली.

नवी मुंबई महापालिकेस जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झाल्याने थेट विभागीय स्तरावर खेळण्याची संधी मिळत असल्याने यामधून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वत:सोबतच शहराचा नावलौकिक वाढविणारे खेळाडू घडत असल्याचे दिसून येत आहे. कॅरम स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षाआतील वयोगटामध्ये ४३१ विद्यार्थी व २७९ विद्यार्थिनी अशा प्रकारे एकूण ७१० खेळाडूंनी सहभाग घेतला.

या स्पर्धेचा शुभारंभ क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या उपायुक्त ललिता बाबर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी त्यांनी मैदानी खेळांप्रमाणेच इनडोअर आणि खासकरून कॅरमसारख्या बैठ्या खेळांनाही मुले व पालकांकडून प्राधान्य दिले जात असल्याचा आनंद व्यक्त करीत शालेय क्रीडा स्पर्धा हे या मुलांसाठी चांगले व्यासपीठ असल्याचे सांगितले. येथील विजेत्या खेळाडूंना थेट विभागीय स्तरावर खेळता येणार असल्याने याचा लाभ खेळाडू विद्यार्थी मोठ्या प्रमाणात घेताना दिसून येत आहेत. अशा प्रकारे सर्व शाळांनी विविध खेळांत जास्तीत जास्त खेळाडू कसे सहभागी होतील व त्यांच्या अंगभूत गुणप्रदर्शनासाठी उपलब्ध झालेल्या या व्यासपीठाचा उपयोग जास्तीत जास्त खेळाडूंना कसा करून घेता येईल यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे मतही व्यक्त केले. या वेळी क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव उपस्थित होते.



या नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत विजयी झालेल्या पहिल्या पाच क्रमांकाच्या खेळाडूंनी पुढील स्तरावरील मुंबई विभागीय कॅरम स्पर्धेसाठी आपला प्रवेश निश्चित केलेला असून या विजयी खेळाडूंचे अभिनंदन करीत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी त्यांना पुढील उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा प्रदान केलेल्या आहेत.

**गटनिहाय सविस्तर निकाल**

१४ वर्षाआतील मुले : प्रथम अल्केश हटकर, सेंट झेवियर्स हायस्कूल ऐरोली; व्दितीय श्रेय पिळणकर, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली; तृतीय श्रीराज धनावडे, एमजीएम हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, नेरूळ; चतुर्थ अर्थव पथाडे, डीएव्ही पब्लिक स्कूल ऐरोली; पाचवा सुयश पवार, डीएव्ही पब्लिक स्कूल ऐरोली.

१४ वर्षाआतील मुली : प्रथम साक्षी पात्रा, पुणे विद्यार्थीगृहाचे विद्याभवन हायस्कूल इंग्रजी शाळा; व्दितीय अनन्या गोरे, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल, ऐरोली; तृतीय रितीका पाटील, प्राथमिक विद्यामंदिर विवेकानंद संकुल सानपाडा; चतुर्थ ख्याती कदम, भारती विद्यापीठ इंग्रजी माध्यम स्कूल सीबीडी; पाचवे अश्लेषा कांबळे, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली.

१७ वर्षाआतील मुले : प्रथम आदित्य नाईक, सेंट झेवियर्स हायस्कूल ऐरोली; व्दितीय ऋषिकेश गव्हाणे, एमजीएम हायस्कूल नेरूळ; तृतीय आर्यन सुर्यवंशी, पुणे विद्यार्थीगृहाचे विद्याभवन स्कूल नेरूळ; चतुर्थ स्पर्श दिवे, टिळक पब्लिक स्कूल नेरूळ; पाचवा अमेय देसाई, अमृता विद्यालयम नेरूळ.

१७ वर्षाआतील मुली : प्रथम गायत्री चव्हाण, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली; व्दितीय रिझा शेख, रायन इंटरनॅशनल स्कूल सानपाडा; तृतीय सान्वी पायी, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली; चतुर्थ खुशबू नारखेडे, न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोली; पाचवी विश्वजा जाधव, रायन इंटरनॅशनल स्कूल सानपाडा.

१९ वर्षाआतील मुले : प्रथम क्रिश पांचाळ, आयसीएल कॉलेज वाशी; व्दितीय अक्षय मोरे, सुशिलादेवी देशमुख ज्युनिअर कॉलेज ऐरोली; तृतीय मनीष चव्हाण, आयसीएल कॉलेज वाशी; चतुर्थ निखील चौरे, स्टर्लिंग ज्युनिअर कॉलेज; पाचवा मोहम्मद तनवीर अहमद, अंजुमन इस्लाम स्कूल, तुर्भे.

१९ वर्षाआतील मुली : प्रथम रुतुला ढेब, सुशिलादेवी देशमुख ज्युनिअर कॉलेज ऐरोली; व्दितीय आर्या शिपाई, आयसीएल कॉलेज वाशी; तृतीय संस्कृती जगताप, आयसीएल कॉलेज वाशी; चतुर्थ कश्मिरा मेहेर, जयपुरियार स्कूल सानपाडा; पाचवी शेख सामिया अली, आयसीएल कॉलेज वाशी.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत सुयश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयाने वेटलिफ्टिंग असोसिएशन रायगडतर्फे रविवारी (दि. ५) कर्जतमधील अभिनव ज्ञानमंदिर प्रशाला येथे आयोजित केलेल्या वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन केले.

या वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये कर्जत, पनवेल, उरण, खालापूर, महाड या तालुक्यातून सुमारे ५० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष किशोर पानसरे, अश्वमेध वेटलिफ्टिंग फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रेय डोळे, विजय खरोशे, रमेश कदम, कैलास मोरे, मुख्याध्यापक धुराजी शिंदे, उपमुख्याध्यापक योगेश्वर निकम आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातील द्वितीय वर्षात शिकणारा विद्यार्थी विशाल पुजारी याने ८१ किलो वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला. हरिहरन यानेही ८९ वजन गटामध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला तसेच कोच अजिंक्य भगत यांनीही वेटलिफ्टिंगमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वेटलिफ्टिंगमध्ये यश मिळविल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, जिमखाना प्रमुख प्रा. प्रथमेश उदेकर तसेच इतर सर्व सदस्यांचे या विद्यार्थ्यांना यश संपादन करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये यश मिळवल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचा पुरुष संघ बाद फेरीत

**पणजी : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या पुरुषांनी ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत कबड्डीत साखळीतील सलग दुसऱ्या विजयाने बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. गोवा येथील मल्टीपर्पज क्रीडा संकुल येथे झालेल्या अ गटात महाराष्ट्राने तामिळनाडूला ४४-२१ असे पराभूत केले. महाराष्ट्राचा शेवटचा साखळी सामना चंदीगडशी होईल.

महिलांना मात्र ब गट साखळीतील राजस्थान विरुद्ध ३०-३० अशा बरोबरीने साखळीतच गारद होण्याची भीती निर्माण झाली. सुरुवात झकास करीत महाराष्ट्राच्या महिलांनी पूर्वार्धात १८-१२ अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात शेवटच्या काही मिनिटांत लोण देत महाराष्ट्राने २७-१६ अशी आघाडी वाढविली, पण शेवटच्या तीन मिनिटांत राजस्थानने जोरदार प्रतिहल्ला करीत बरोबरी साधण्यात यश मिळविले. शेवटच्या क्षणी महाराष्ट्राने राजस्थानला गुण बहाल केल्यासारखे वाटत होते. या बरोबरीने महाराष्ट्राच्या महिलांचा बाद फेरीतील प्रवेश जवळपास संपुष्टात आल्याचे वाटते.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com